# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२३

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०२३ / श्रावण ६, १९४५ (शके)**

| | | |
|---|---|---|
| (१) | सहकार मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकास मंत्री | |
| (३) | वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री | |
| (४) | कृषी मंत्री | |
| (५) | रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री | |
| (६) | इतर मागास बहुजन कल्याण मंत्री | |
| (७) | राज्य उत्पादन शुल्क मंत्री | |
| (८) | मदत व पुनर्वसन मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४५**

---

### राज्यातील बियाणे उद्योग तेलंगणा व आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये स्थलांतरित होत असल्याबाबत

**(१) * १९४२८ श्री.सचिन अहिर, श्री.अंबादास दानवे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ३५० हून अधिक बियाणे उत्पादक कंपन्या असून कोट्यवधी रुपयांची उलाढाल असणारा बियाणे उद्योग हा शासन आणि बियाणे कंपन्यांमध्ये असलेला सहकार्याचा अभाव, शासकीय अधिकारी यांचेकडून होणारा त्रास, दळणवळणाच्या गैरसोयी, बोगस बियाणे असा शिक्का मारण्याची असलेली भिती तसेच शेजारच्या राज्यांमध्ये जागेसह मोठ्या प्रमाणात मिळणाऱ्या सवलती यामुळे बियाणे उत्पादकांनी महाराष्ट्रातून तेलंगणा आणि आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये स्थलांतरीत केला असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी जालना येथील उद्योगांकरिता १०० कोटीं रुपयांच्या तरतुदींची घोषणा आणि बियाणे हब संकल्पना मांडली होती, ती अदयाप पूर्णत्वास आलेली नसून परराज्यातील हैद्राबाद हे बियाणे हब म्हणुन पुढे आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंध्रप्रदेश व तेलंगणा राज्यांनी जागेसह विविध प्रकारच्या सोयी सवलती दिल्याने एकेकाळी कापूस, मका, बाजरी, सुर्यफूल, भुईमूग, गहू इ. बियाण्यांच्या उत्पादनात क्रमांक एकवर असणारा हा उद्योग शासनाच्या उदासीनतेमुळे स्थलांतरित झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बियाणे उद्योग महाराष्ट्रातून तेलंगणा व आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये स्थलांतरित होऊ नयेत याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) मौजे पानशेंद्रा, जि.जालना येथे जिल्हाधिकारी, जालना यांनी सीड पार्क उभारणीसाठी ७५ एकर जमीन उपलब्ध करून दिली आहे. जालना सीड पार्क विकसित करण्याच्या संदर्भात महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित (महाबीज), अकोला नोडल एजन्सी म्हणून काम करीत आहे. सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील बियाणे उद्योजकांच्या गरजा तसेच नव-उद्योजक शेतकरी, छोटे उद्योजक, शेतकरी उत्पादक कंपन्या यांचेसाठी आवश्यक सुविधा निश्चित करून डीपीआर (Detailed Project Report) तयार करण्यात आलेला आहे. सदर सीड पार्क राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत राबविण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार Techno Feasibility अहवाल तयार करण्यात आलेला असून सदर अहवाल मान्यतेस्तव विचाराधीन आहे.
(३) हे खरे नाही. राज्यात सन २०१९ मध्ये ६५४ बियाणे कंपन्या कार्यरत होत्या. सन २०२१ पासून आपले सरकार पोर्टल व महा परवाना प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत १४८० कापुस व इतर बियाणे कंपन्या कार्यरत आहेत. यावरून नोंदणीकृत बियाणे कंपन्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसून येते आहे.
(४) राज्यात बियाणे उत्पादन क्षेत्रात वाढीसाठी पोषक वातावरण निर्मिती करण्यासाठी जालना येथे सीड पार्क उभारण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर प्रकल्पामध्ये सामुदायिक सुविधा केंद्र, बीज प्रक्रिया केंद्र, बियाणे साठवणुकीसाठी गोदाम, बीज परिक्षण प्रयोगशाळा, डीएनए फिंगर प्रिंटिंग प्रयोगशाळा, इ. बाबींचा अंतर्भाव होणार असल्याने बियाणे उद्योजकांना त्याचा निश्चितच फायदा होणार आहे. या शिवाय राज्यात शेतकरी उत्पादक कंपन्यांना बिजोत्पादन व विक्री परवाने देऊन बिजोत्पादनास प्रोत्साहन देण्यात येत आहे. बियाणे व लागवड साहित्य उपअभियान योजनेतून सन २०२१-२२ व २०२२-२३ या वर्षात ४१ शेतकरी उत्पादक कंपन्यांना बियाणे गोदाम व बिज प्रक्रिया केंद्र या बाबीसाठी एकूण रक्कम रुपये १३.६५ कोटी अनुदान देण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(२) * १९७२८ श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.रामदास आंबटकर, प्रा.राम शिंदे, श्री.निलय नाईक, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत २०१८ पासून विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनाने सन २०२२ मध्ये निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार निवड झालेल्या ५० विद्यार्थ्यांनी परदेशातील शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेऊन त्यांचे शिक्षणही सुरू झाले मात्र अद्याप शासनाने शिष्यवृत्ती सुरू केली नसल्याने अनेक विद्यार्थी व पालक आर्थिक अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी सदर शिष्यवृत्ती योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अल्याळी (जि.पालघर) येथील गुरचरण जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत

**(३) * १९५२२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अल्याळी (ता.जि.पालघर) येथील जुना सर्व्हे नंबर ६५ तसेच नवीन गट नंबर १९८ मधील गुरचरण जमिनीचा काही भाग नागरी गावठाण विस्तारासाठी वापरण्यात येऊन उर्वरित भागामध्ये अनधिकृत बंगले उभारण्यात येऊन बंगल्यांची परस्पर विक्री केल्याचे नुकतेच माहे मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गट नंबरमधील मोकळ्या जागेवर काही नागरिकांनी नगरपरिषदेतून बनावट कागदपत्रांच्या आधारे घरपट्टी लावून, सुमारे दोन ते तीन गुंठे क्षेत्रफळ असणाऱ्या १५ भूधारकांपैकी काही भूधारकांनी शासनाची परवानगी न घेता किंवा शुल्क न भरता परस्पर अंदाजे १० ते ४० लाख रुपयांना भूखंड व बंगल्यांची विक्री केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाची परवानगी न घेता किंवा शुल्क न भरता भूखंड व बंगल्यांची विक्री करुन खरेदीदारांची फसवणूक केल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, तसेच चौकशीच्या अनुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे अल्याळी (ता.पालघर, जि.पालघर) येथील गट नं.१९८/१/अ क्षेत्रे २९/४०/५४ हे.आर जमीन गा.नं.नं.७/१२ सदरी गुरचरण म्हणून दाखल आहे. सदर जमिनीमध्ये उपविभागीय अधिकारी, डहाणू यांचे दिनांक ३०/११/१९७१, दिनांक २८/०९/१९७१ व

दिनांक २८/०५/१९७४ चे आदेशान्वये एकूण ८७ व्यक्तींना नवीन शर्त भोगवटादार वर्ग-२ ने रहिवास प्रयोजनार्थ भूखंड दिलेले आहेत.

गावाच्या अतिक्रमण रजिस्टर नोंदवही नुसार एकूण ४३ अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण केले असून सदर अतिक्रमणधारकांपैकी २५ अतिक्रमणधारकांनी ३ गुंठे व १८ अतिक्रमणधारकांनी २ गुंठे क्षेत्रावर निवासी स्वरुपाची घरे तसेच बंगले बांधले आहेत.

मुख्याधिकारी, नगरपरिषद पालघर यांचे अहवालनुसार मौजे अल्याळी येथील जुना सर्व्हे नं.६५ नवीन गट नं.१९८ मधील गुरचरण जागेत नगर परिषदेकडून कोणत्याही प्रकारची नवीन घरपट्टी आकारल्याची नोंद नाही. तसेच प्रशासकीय अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१, सह जिल्हा निबंधक वर्ग-१ पालघर यांचेकडे जुना सर्व्हे नंबर ६५ तसेच नवीन गट नंबर १९८ मधील मिळकतींचे खरेदी/विक्रीबाबतचे दस्त नोंदणी झालेले नाही.

-----------------

## महाज्योती संस्थेने एमएचटी-सीईटी, जेईई व नीटच्या प्रशिक्षणार्थीची संख्या कमी केल्याबाबत

**(४) * १९४१६ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या महाज्योती या स्वायत्त संस्थेमार्फत गोरगरिब व गुणवंत विद्यार्थ्यांसाठी तसेच इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना एमएचटी-सीईटी, जेईई व नीट या परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षण दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाज्योतीतर्फे देण्यात येणाऱ्या एमएचटी-सीईटी, जेईई व नीट या परीक्षांच्या प्रशिक्षणार्थीची संख्या गेल्या वर्षी १५ हजारांवरून ६५०० पर्यंत कमी करण्यात आली असल्याने उर्वरित विद्यार्थ्यांना प्रशिक्षणापासून वंचित रहावे लागणार असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(३) असल्यास, सदरील प्रशिक्षणार्थींची संख्या कमी करण्याची कारणे काय आहेत तसेच सदरील प्रशिक्षणार्थींची संख्या कायम ठेवणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय. हे खरे आहे.

(२) व (३) महाज्योती संस्थेत सन २०२२-२३ मध्ये MHT-CET/JEE/NEET या प्रशिक्षणाकरिता विद्यार्थ्यांचे एकूण ४९६२ अर्ज प्राप्त झालेले होते. त्यापैकी ४२११ विद्यार्थी प्रशिक्षणासाठी पात्र होते.

सन २०२२-२३ मध्ये प्रत्यक्ष लाभ घेतलेल्या विद्यार्थ्याची संख्या लक्षात घेऊन सन २०२३-२४ करिता विद्यार्थ्यांच्या सख्येंत वाढ करुन ६५०० करण्यात आली.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंतप्रधान किसान सन्मान निधी व नमो शेतकरी महासन्मान योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांना लाभ देण्याबाबत

**(५) * १८९६४ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.सत्यजीत तांबे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अरुण लाड, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १८५५३ ला दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना तीन टप्प्यात सहा हजार रुपये देण्याची तरतूद असताना राज्यातील ११ लाख अपात्र शेतकऱ्यांच्या खात्यात १५५४ कोटी रुपये जमा करण्यात आल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने केंद्र शासनाने दिलेल्या आदेशानुसार आजपर्यंत केलेल्या पडताळणीमध्ये गोंदिया जिल्ह्यातील ५ हजार ६४५ शेतकऱ्यांना अपात्र ठरविण्यात आले असून दीड हजारांहून अधिक लाभार्थ्यांची त्या भागात जमीनच नसल्याचे दिनांक २० मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे व सदर अपात्र शेतकऱ्यांच्या खात्यावरील रक्कम वसूल करण्याबाबत कृषी विभागाने आदेश दिले असून खात्यातून रक्कम काढून घेतलेल्या अपात्र शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावर थकबाकीची नोंद करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरेगाव (जि.सातारा) तालुक्यात राष्ट्रीयकृत बँकांमधील अधिकाऱ्यांच्या अनागोंदी कारभारामुळे ३ हजारांहून अधिक शेतकरी पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या लाभापासून वंचित असल्याचेही माहे मे, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा १४ वा हप्ता १० जूनपूर्वी शेतकऱ्यांना मिळणार असून सदर योजनेचे निकष राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान योजनेसाठी लागू करण्यात आले असून राज्यातील ७१ लाख लाभार्थी शेतकऱ्यांपैकी उक्त निकषांची पुर्तता न करणारे ३२ लाख ३७ हजार शेतकरी राज्य शासनाच्या पहिल्या हप्त्यापासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, केंद्रा शासनाच्या निकषांची पुर्तता करुन जास्तीत जास्त शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या नमो शेतकरी महासन्मान योजनेचा लाभ देण्याबाबत तसेच उक्त दोन्ही योजनांतर्गत केवळ पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व अपात्र शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या मार्गदर्शक सुचनांमधील अपात्रतेच्या निकषांनुसार राज्यात सद्य:स्थितीतील एकूण १४.२८ लाख अपात्र ठरलेल्या लाभार्थींकडून रक्कम रुपये १७५४.५० कोटी वसुलपात्र आहे. सदरचा लाभ परतावा वसूल करण्याची कार्यवाही महसूल विभागाकडून सुरु असून दिनांक १०/०७/२०२३ अखेर एकूण १.०४ लाख लाभार्थींकडून रक्कम रुपये ९३.२१ कोटी वसूल करण्यात आलेली आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे राज्यात यादृच्छिक पध्दतीने ५ टक्के व १० टक्के लाभार्थींची भौतिक तपासणी करण्यात येत आहे. त्यामध्ये गोंदिया जिल्ह्यातील २७५९९ लाभार्थीपैकी १५,२५९ लाभार्थींची भौतिक तपासणी केल्यावर एकूण १,४४८ लाभार्थी अपात्र ठरले आहेत. उर्वरीत १२,३४० लाभार्थींची भौतिक तपासणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

पी.एम.किसान योजनेंतर्गत अपात्र लाभार्थींना अदा झालेल्या लाभ परताव्याची रक्कम वसूली महसूल विभागाकडून करण्यात येत आहे. गोंदिया जिल्ह्यामध्ये अपात्र लाभार्थींना अदा झालेल्या लाभ परताव्याची वसुलीची नियमोचित कार्यवाही तहसिलदार यांचेमार्फत सुरू असून थकबाकीची नोंद सातबारा उताऱ्यावर करण्यात आलेली नाही.

(३) हे खरे नाही.

कोरेगाव तालुक्यातील ३७,५३१ पात्र लाभार्थींची बँक खाती आधार संलग्न करण्यात आली असून उर्वरीत ३०६३ पात्र लाभार्थींची बँक खाती आधार संलग्न करण्याची कार्यवाही सुरू आहे. लाभार्थींना पोस्ट खात्यामध्ये विनाशुल्क बँक खाते उघडून ते आधार संलग्न करण्याची सुविधा देखील उपलब्ध करण्यात आलेली आहे.

(४) हे, अंशतः खरे आहे.

पात्र लाभार्थींची भूमि अभिलेख नोंदीप्रमाणे पोर्टलवर माहिती अद्ययावत करणे, ई-केवायसी प्रमाणिकरण व बॅंक खाती आधार संलग्न करणे तिनही बाबींची पूर्तता केलेले एकूण ७६.५५ लाख लाभार्थी १४ व्या हप्त्याच्या लाभासाठी पात्र ठरत आहेत. तथापि, केंद्र शासनाने बंधनकारक केलेली ई-केवायसी प्रमाणिकरणाची बाब शिथिल केली असल्याने सद्य:स्थितीत राज्यातील एकूण ८५.०१ लाख पात्र लाभार्थींना १४ व्या हप्त्याचा लाभ अदा होईल.

(५) राज्यातील एकूण ९७.६५ लाख पात्र लाभार्थीपैकी ९५.२७ लाख लाभार्थींच्या भूमि अभिलेख नोंदी पी.एम.किसान पोर्टलवर अद्ययावत करण्यात आलेल्या आहेत. उर्वरीत २.३८ लाख लाभार्थींच्या नोंदी अद्ययावत करण्यासाठी संबंधित सर्व जिल्हाधिकारी यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे ८४.८१ लाख लाभार्थींचे ई-केवायसी प्रमाणिकरण व ८७.७७ लाख लाभार्थींची बँक खाती आधार संलग्न करण्यात आलेली असून योजनेच्या निकषानुसार लाभार्थ्यांच्या प्रलंबित बाबींची कार्यपूर्तता करणेसाठी सामाईक सुविधा केंद्र (CSC) व इंडिया पोस्टल पेमेंट्स बॅंक (IPPB) यांचे सहकार्याने गावपातळीवरील कॅम्प आयोजित करण्यात आले आहेत.

योजनेच्या लाभासाठी भूमी अभिलेख नोंदी अद्ययावत करणे, eKYC प्रमाणिकरण व बँक खाती आधार संलग्न करणे या बंधनकारक बाबींची पुर्तता न केल्याने राज्यातील अपात्र लाभार्थींच्या संख्येत व वसूल करावयाच्या रकमेत वाढ झालेली आहे. अपात्र लाभार्थींना अदा झालेल्या लाभ परताव्याची महसूल विभागाकडून नियमोचित वसूली करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## “मिशन अमृत सरोवर” या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(६) * १९१५५ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या “मिशन अमृत सरोवर” ह्या प्रकल्पांतर्गत राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक एकर क्षेत्रफळाचे ७५ अमृत सरोवरे निर्माण करण्यात येणार असून हे काम दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ पर्यंत पूर्ण करावयाचे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२३ चा एप्रिल महिना उलटला तरी राज्यात सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या झालेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निर्णय घेऊन सदरील प्रकल्पाचे काम अपेक्षित दिवसात पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) ३४ जिल्ह्यांपैकी ४ जिल्ह्यांनी सामंजस्य करार केलेले आहेत. उर्वरित जिल्ह्यांमध्ये रोहयो, नरेगा, कंपन्यांचा सामाजिक उत्तरदायित्व निधी, जिल्हा वार्षिक योजना व अन्य योजनेच्या माध्यमातून सदर कामे पूर्ण करण्यात आली आहे. त्यामुळे अन्य ३० जिल्ह्यांमध्ये सामंजस्य करार करण्यात आलेले नाही. प्रकल्पांचे काम अपेक्षित दिवसांत पूर्ण झालेले असून ईष्टांकाची पूर्तता झालेली आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबईतील कोळीवाडे महसूल विभागाच्या अखत्यारित आणून कोळी समाजाच्या नावे करण्याबाबत

**(७) * १९२५७ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १८१८७ ला दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या महसूल विभागाने सीमांकन केल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिका, धारावी पुनर्विकास प्रकल्प, म्हाडा आणि मुंबई पोर्ट ट्रस्ट ही शासकीय प्राधिकरणे शिवडी, सायन, धारावी, कुलाबा, माहीम, माहिम मार्केट, वरळी, मांडवी या आठ कोळीवाड्यांमधील हजारो चौरस मीटर जमिनी त्यांच्या अखत्यारित असल्याचा दावा करुन वेगवेगळे आक्षेप नोंदवित असल्याने, या कोळीवाड्यांमध्ये कोणताही विकास करावयाचा असल्यास ही प्राधिकरणे विरोध करण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व कोळीवाडे महसूल विभागाच्या अखत्यारित आणून या जमिनी कोळी समाजाच्या नावे करण्याची मागणी कोळीबांधवांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील कोळीवाडे महसूल विभागाच्या अखत्यारित आणून या जमिनी आद्य भूमिपुत्र असलेल्या कोळी समाजाच्या नावे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) सहाय्यक संचालक, मत्स्यव्यवसाय विभाग, मुंबई यांनी कळविलेल्या कोळीवाड्यांच्या बाहेरील हद्दींची मोजणी केलेल्या मोजणी नकाशानुसार कोळीवाड्यांच्या सीमांकनामध्ये समाविष्ट असणाऱ्या प्राधिकरणांनी त्यांच्या मालकीच्या जमिनी कोळीवाड्यांमध्ये समाविष्ट करू नये अशा हरकती उपस्थित केल्या आहेत हे खरे आहे.
(२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे.

कोळीवाडा सिमांकन हद्दींमध्ये समाविष्ट मिळकतींच्या मिळकतपत्रिका (अधिकार अभिलेख) मूळ भूमापनावेळी/ तद्नंतरचे सर्व्हेक्षणावेळी उघडण्यात आले असून त्यावर खाजगी व्यक्ती, संस्था, प्राधिकरण यांची नोंद दाखल असल्याचे निदर्शनास येते. कोळीवाडा सिमांकनामध्ये येत असलेल्या सार्वजनिक प्राधिकरण व खाजगी संस्थांनी त्यांच्या मिळकतींसंदर्भात घेतलेल्या आक्षेपांस अनुसरुन जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेस्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

सार्वजनिक वापराच्या जमीनीसंदर्भात गांवठाणाशेजारी किंवा किनाऱ्यालगत मत्स्य व्यवसायासाठी म्हणजेच जाळी सुकविणे, जाळी विणणे, मासे सुकविणे, बोटी शाकारणे, दुरूस्त करणे, याकरिता खुल्या जागा वापरल्या जातात. दिनांक ०४/०२/१९८३ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २२ प्रमाणे अशा सार्वजनिक हक्काच्या नोंदी सातबाराच्या इतर हक्कात घेण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डोंबिवली (जि.ठाणे) येथील अनधिकृत इमारतींच्या नोंदणी गैरव्यवहाराबाबत

**(८)** * **१९७७० ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवलीतील (जि.ठाणे) महारेरा बेकायदेशीर नोंदणी गैरव्यवहारातील अनधिकृत इमारतीमधील सदनिकांच्या खरेदी विक्री व्यवहारांची दस्त नोंदणी न करण्याच्या सूचना असतानाही सदनिकांची दस्त नोंदणी केल्याप्रकरणी संबंधित सह दुय्यम निबंधकावर दिनांक १० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास कारवाई करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय हे खरे आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील कल्याण ग्रामीण परिसरातील बेकायदेशीर इमारतीमधील सदनिकांची नोंदणी करीत असल्याबाबत सह दुय्यम निबंधक, कल्याण क्र. २ यांचेविरुध्द

तक्रारी प्राप्त झाल्यामुळे श्री.जी.बी. सातदिवे, सह दुय्यम निबंधक, कल्याण क्र. २ यांचेकडील सह दुय्यम निबंधक कल्याण क्र. २ या पदाचा कार्यभार दिनांक १०/०५/२०२३ रोजी काढून घेण्यात आला आहे.

(२) सह जिल्हा निबंधक वर्ग-१, ठाणे शहर कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार सह दुय्यम निबंधक कल्याण क्र. २ कार्यालयात दिनांक ०१/०४/२०२२ ते ३१/०३/२०२३ या कालावधीत नोंदविलेल्या दस्तऐवजांची तपासणी करणेकामी ६ पथकांची नेमणूक सह जिल्हा निबंधक वर्ग-१, ठाणे शहर यांचे आदेश दिनांक ०६/०४/२०२३ अन्वये करण्यात आली आहे.

उक्त तपासणी पथकामार्फत तपासणी सुरु असून तपासणीचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुषंगाने कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संयुक्त राष्ट्र संघाने २०२३ हे आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष घोषित केल्याबाबत

**(९) * १९६५० प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संयुक्त राष्ट्र संघाने २०२३ हे आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष घोषित केले आहे, त्यामुळे भरड धान्याने मुले व किशोरवयीन यांचा विकास २६ ते ३९ टक्के होऊन वृद्धांचे होणारी कुपोषण रोखणे सुलभ होणार असल्याची बाब माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्वारी, बाजरी, जव, कोदो, सामा, सोया तसेच लघु धान्यात कुटकी, कांगणी, नाचणी व घीनासारखी धान्य समाविष्ट आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भरड धान्याचे पौष्टिक पदार्थ लहान थोरांना देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे आहे.

संयुक्त राष्ट संघाने सन २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून घोषित केलेले आहे. पौष्टिक तृणधान्य सर्वच वयोगटातील व्यक्तींसाठी रोजच्या उर्जेच्या गरजा भागविण्यासाठी आवश्यक आहे.

(२) ज्वारी, बाजरी, नाचणी, वरई, राळा, कोडो, कुटकी, सावा, राजगिरा, इत्यादी धान्यांचा समावेश केंद्र शासनाने पौष्टिक तृणधान्यांमध्ये केला आहे.

(३) पौष्ट्रिक तृणधान्यापासून तयार केलेल्या पदार्थांचा वापर आहारात वाढविण्याच्या दृष्टीकोनातून ३ वर्षे वयोगटातील बालके, गरोदर महिला व स्तनदा माता तसेच ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालके यांना आठवड्यातून १ दिवस हा आहार उपलब्ध करुन देण्यासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे. शालेय शिक्षण विभागाने त्यांच्या दिनांक ११ जुलै, २०२३ च्या परिपत्रकान्वये दिनांक १ ऑगस्ट, २०२३ ते १५ ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत पौष्ट्रिक तृणधान्याचे महत्व शालेय विद्यार्थांना समजण्यासाठी, त्याचा आहारातील वापर वाढविण्यासाठी विविध उपक्रमांचे

आयोजन केले आहे. तसेच शासकीय आश्रमशाळा, वसतिगृहे, यामध्ये पौष्ट्रिक तृणधान्यापासून तयार झालेल्या पाककृतींचा समावेश आठवड्यातून किमान एक/ दोन दिवस करण्याच्या अनुषंगाने संबंधित विभागांकडून कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सुधारित अकृषिक प्रमाणदराच्या आधारे कराच्या आकारणीच्या वसुलीस देण्यात आलेल्या स्थगितीबाबत

**(१०) * १९००१ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक १८४२९ ला दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सुधारित अकृषिक प्रमाणदराच्या आधारे कराच्या आकारणीच्या वसुलीस देण्यात आलेली स्थगिती उठविण्याबाबत व त्यासंदर्भात करावयाच्या अनुषंगिक अंमलबजावणीत सुसूत्रता आणण्याकरिता सर्वकष अभ्यास करुन शासनास योग्य शिफारस करण्याकरिता अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती दिनांक ०६ जून, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अभ्यास समितीच्या आजतागायत किती बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत, सदर समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, सदरहू अहवालात करण्यात आलेल्या शिफारसींचे थोडक्यात स्वरूप काय आहे आणि सदरहू शिफारसींच्या अंमलबजावणीबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) होय हे खरे आहे.

शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एनएपी-२०२२ /प्र.क्र.५०/ज-१अ, दिनांक ०६/०६/२०२२ अन्वये अकृषिक कराच्या आकारणीच्या वसूली संदर्भात शासनाची भूमिका ठरविण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती नियुक्त करण्यात आली आहे. सदर समितीच्या आजतागयत दोन वेळा बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. तसेच सदर समितीचा अहवाल शासनास अद्यापपर्यंत अप्राप्त आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धानिवरी (ता.डहाणू, जि.पालघर) येथील आदिवासी कुटूंबांना जमिनीचा मोबदला न देताच बळजबरीने घराबाहेर काढण्यात आलेबाबत

**(११) * १९९८१ श्री.आमश्या पाडवी, ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धानिवरी (ता.डहाणू, जि.पालघर) येथील सर्व्हे क्र. ६४/२ व ८१/१ येथील आदिवासी कुटुंबियांना मुंबई-बडोदा एक्स्प्रेसवेसाठी भूसंपादन करताना जमिनीचा मोबदला न देताच पोलिसांनी अमानुष वागणूक देऊन बळजबरीने घराबाहेर काढल्याने पालघर जिल्ह्यातील मा.लोकप्रतिनिधींनी घटनास्थळी भेट देऊन महसूल विभागाचे संबंधित अधिकारी व पोलीस अधिकारी यांचेविरुध्द कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे तक्रार केली असल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी अपर जिल्हाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखाली चार सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू समितीने शासनास अहवाल सादर केला आहे काय, त्यानुसार उक्त प्रकरणी महसूल विभागाचे संबंधित अधिकारी व पोलीस अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) पालघर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी महसूल विभागातील संबंधित अधिकारी व पोलीस अधिकारी यांचेविरुध्द कारवाई करण्यासाठी अशा आशयाची जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी तक्रार केली आहे. या प्रकरणातील तपशिल आणि सदर तक्रारीच्या अनुषंगाने या प्रकरणी अपर जिल्हाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखाली ५ सदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली असून, गठीत समितीचा अहवाल अप्राप्त आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात नाथजोगी, नाथपंथी, डवरी गोसावी व गोंधळी समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत

**(१२) * १९७३६ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नाथजोगी, नाथपंथी, डवरी गोसावी व गोंधळी समाजाने स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी मा.जिल्हाधिकारी ठाणे यांच्यामार्फत शासनाला केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या समाजातील लोकांचा मानव विकास निर्देशांक खूप कमी असून लोक अद्यापही उच्च शिक्षित नसल्याने बहुतांश लोक दारिद्र्यरेषेखालील असून समाजातील लोकांकडे उपजीविकेची व उत्पन्नाची साधने नसल्याने लोक पारंपारिक व्यवसाय म्हणजे भिक्षा मागणे, जागरण गोंधळ घालणे, डवर वादन तसेच भराडी घालणे इत्यादी व्यवसाय करून जीवन जगत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या समाजाचा वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळात समावेश आहे, परंतु यामध्ये एकूण २८ ते २९ जातीचा यात समावेश असल्याने नाथपंथी समाजापर्यंत या योजना पोहोचत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नाथपंथी समाजाच्या विकासासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) व (२) राज्यातील नाथजोगी, नाथपंथी, डवरी गोसावी, गोंधळी समाजाने स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी मा.जिल्हाधिकारी ठाणे यांच्यामार्फत शासनास प्राप्त झाली आहे.
(३) हे खरे नाही.

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कर्ज योजनेंतर्गत विमुक्त जाती, भटक्या जमाती अंतर्गत येणाऱ्या ५१ जाती ४३ उपजातीतील समाजाला तसेच नाथजोगी, नाथपंथी, डवरी गोसावी व गोंधळी इत्यादी जातींना व उपजातींना महामंडळाच्या प्रादेशिक व जिल्हा कार्यालयामार्फत विविध कर्ज योजनांचा लाभ देण्यात येत आहे.
(४) नाथपंथी समाज हा भटक्या जमाती प्रवर्गामध्ये मोडतो. विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उत्थानासाठी शासन निर्णय दिनांक ०८ फेब्रुवारी, १९८४ रोजी कंपनी कायदा, १९५६ नुसार वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ स्थापन करण्यात आले आहे. या महामंडळाच्या राज्यातील सर्व जिल्हा कार्यालयातून विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाच्या उत्थानाच्या योजनांविषयक कामकाज हाताळण्यात येते. त्यामुळे नाथपंथी समाजाच्या विकासासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोकण विभागातील आंबा बागायतदारांना आर्थिक मदत मिळण्याबाबत

**(१३) * १८८९९ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बदलणारे हवामान, अवकाळी पाऊस तसेच थ्रीप्स व तुडतूडा या रोगामुळे हापूस आंब्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असल्याने कोकणातील आंबा बागायतदार आर्थिक अडचणीत सापडला असून यावर्षी उत्पादनांपेक्षा १० टक्केही हापूस आंब्याचे पीक शेतकऱ्यांना मिळाले नसल्याने आंबा उत्पादकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केल्याची बाब दिनांक १२ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याच्या परिस्थितीमुळे पिकांचे सर्वेक्षण कृषी विभागामार्फत होणे आवश्यक असून कोकण कृषी विद्यापीठाने शासनाला अहवाल दिलेला असतानाही त्यावर कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आंबा बागायतदारांची यावर्षीची परिस्थिती लक्षात घेता पुढील वर्षी बागायतदारांसाठी शासनाने विशेष पॅकेजची घोषणा करावी अशी मागणी बागायतदारांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोकणातील आंबा बागायतदारांना आर्थिक मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील अनधिकृत धाबा बांधकामे हटविण्याबाबत

**(१४) * १९७८४ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, प्रा.राम शिंदे, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील धाबा धारकांना पालघर महसूल विभागाकडून अनधिकृत बांधकामे काढण्यासाठी नोटीस बजावण्यात आल्याचे तसेच यातील अनेक धाबे हे स्थानिक आदिवासी व वनविभागाच्या जागेत अनधिकृतरित्या बांधण्यात आले असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील अनधिकृत धाबे बांधणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) मुंबई-अहमदाबाद महामार्ग पालघर जिल्ह्यातील वसई, पालघर, डहाणू व तलासरी या तालुका हद्दी मधून जात आहे. पालघर तालुक्यातील आदिवासी तसेच शासनाच्या जमिनीवर अनधिकृत धाबा बांधकाम धारक यांना नोटीस बजावून एकूण ४३ अनधिकृत धाब्यांचे बांधकामे दूर करण्यात आली आहेत. तसेच डहाणू तालुक्यातील आदिवासी जागेत एकूण २२ धाब्यांची बांधकामे निदर्शनास आली असून सदर बांधकामे आदिवासी खातेदारांनी त्यांचे मालकी जागेत स्वत: बांधकाम केलेले आहेत. यापैकी १५ हॉटेल/धाब्यांना बांधकाम परवानगी देण्यात आली असून ०६ हॉटेल/धाब्यांवर दंडनिय कारवाई करण्यात आली आहे. ०१ हॉटेल बिनशेती परवानगीवर प्रलंबित आहे.

तसेच डहाणू वन विभागांतर्गत वन विभागाचे जागेत एकूण २६ अनधिकृत धाबा धारकांची संख्या असून २४ अतिक्रमण धारकांना अतिक्रमण हटविण्याबाबत नोटीस बजावण्यात आली असून २ प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. तसेच मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील वसई-विरार महानगरपालिका परिक्षेत्रात दिनांक २३/१०/२०१८ ते ०५/०७/२०२३ या कालावधीत १८० अतिक्रमणे निष्कासन करण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील पानशेत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना संपादित केलेल्या वर्ग-१ च्या जमिनींच्या मोबदल्यात वर्ग-२ च्या जमिनी दिल्याबाबत

**(१५) * १९९९१ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील पानशेत धरण तयार करताना शेतकऱ्यांच्या अधिग्रहित केलेल्या वर्ग-१ च्या जमिनीच्या मोबदल्यात शासनाने दौंड तालूक्यातील वर्ग-२ च्या जमिनी शेतकऱ्यांना देण्यात आल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वर्ग-२ च्या जमिनींचे हस्तांतरण अथवा विक्री करण्यास शेतकऱ्यांना फार अडचणी येत असून, वर्ग-१ च्या जमिनीच्या मोबदल्यात वर्ग-२ च्या जमिनी देऊन शासनाने शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांची वर्ग-२ ची जमीन वर्ग-१ मध्ये रुपांतरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.
पुणे जिल्ह्यातील पानशेत प्रकल्पबाधित व्यक्तींच्या बुडीत क्षेत्रातील भोगवटादार वर्ग-१ संपादित जमिनींच्या अनुषंगाने त्यांना दौंड तालुक्यात भोगवटादार वर्ग-२ पर्यायी जमीन माहे मे, २०२३ वा त्यादरम्यान वाटप करण्यात आलेली नाही. तथापि, सन २०१९ पुर्वी प्रकल्पग्रस्तांना भोगवटादार वर्ग-२ वर पर्यायी जमिनी वाटप करण्यात आलेल्या आहेत.
(२) व (३) महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक ०७/०३/२०१९ नुसार, प्रकल्पग्रस्तांना भोगवटादार वर्ग-२ वर देण्यात आलेल्या शेतजमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्याबाबत कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिल्लोड (जि.औरंगाबाद) येथील सर्व्हे नं. ९१ व ९२ मधील जमिनी वर्ग-१ च्या असल्याबाबतचे बनावट सातबारे तयार केल्याबाबत

**(१६) * १९३९५ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) येथील भोकरदन चौफुलीवर सर्व्हे नं. ९२ मध्ये श्री.साहेब खाँगुलजार खाँपठाण यांनी तब्बल २७ वर्षांपुर्वी अब्दुल समद मोहम्मद शरीफ यांना आपली १ एकर ७ गुंठे जमीन तारण दिली होती, त्यांनी त्यांचा व्यवहार पूर्ण झाल्यानंतर हिबा करारानुसार त्यांनी आपला व्यवहार संपुष्टात आणला परंतु विद्यमान तलाठी काशीनाथ ताठे, सिल्लोड यांनी या जमिनीचा सक्षम अधिकाऱ्यांची परवानगी न घेता नियमबाह्य फेरफार घेऊन सातबाऱ्यामध्ये अब्दुल समद यांचे नाव समाविष्ट केल्याचे माहे मे, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिल्लोड येथील सर्व्हे नं. ९१ व ९२ मध्ये मोठ्या प्रमाणात शासकीय गायरान जमिनी, इनामी व सिलींगच्या तसेच कुळ कायद्याच्या अशा (प्रतिबंधित सत्ताप्रकार) वर्ग-२ च्या जमिनी आहेत व या सर्व जमिनी महसूल विभागामार्फत वर्ग-१ च्या असल्याचे खोटे दाखवून तहसिल कार्यालयामार्फत बनावट सातबारे तयार करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) श्री.गुलजारखाँ बुढाणखाँ यांचा वारस मुलगा श्री.साहेबखाँ गुलजारखाँ पठाण यांनी दिनांक २७/०३/१९९५ रोजी नोंदणीकृत खरेदीखताआधारे १ एकर ७ गुंठे जमीन श्री.अब्दुल समद मो. शरीफ यांना विक्री केली. सदर खरेदीखता आधारे फेरफार क्र. २६६१२ ही नोंद घेऊन खरेदीकार श्री.अब्दुल समद मो. शरीफ यांचे नाव ७/१२ वर घेण्यात आलेले आहे. तथापि, सदर प्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २४७ अन्वये अप्पर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे अपील दाखल असून सदर प्रकरणात दिनांक २३/०५/२०२३ रोजी स्थगिती आदेश दिलेले आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) यासंदर्भात अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना सविस्तर तपशिल तपासून कायदेशीर निर्णय घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यामध्ये सागवानाची होणारी तस्करी रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१७) * १९०७१ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र व तेलंगणा सीमेवरील जंगलामध्ये सागवानाची तस्करी करणाऱ्यांनी माहे, मार्च २०२३ या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यामध्ये वन विभागाच्या पथकावर दगडफेक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिरोंचा वन परिक्षेत्राच्या दुबापल्ली जंगलामध्ये बचावासाठी वन अधिकाऱ्यांनी हवेत गोळीबार केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यानंतर वन विभागाच्या पथकाने घटनास्थळावर १४ बैल, ७ बैलगाड्या व लाखो रूपयांचे सागवान व मुद्देमाल जप्त केलाआहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागील वर्षात गडचिरोली जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र व तेलंगणा सीमेवर सागवानाच्या तस्करीच्या एकूण किती प्रकरणांमध्ये फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आणि त्यानुसार किती गुन्हेगारांना शिक्षा झाली आहे,

(५) असल्यास, या वनक्षेत्रातील वाढती तस्करी रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.

दिनांक २५/०३/२०२३ रोजी गुप्त माहितीच्या आधारे रंगधामपेठा (दुब्बापल्ली) नियतक्षेत्रातील खंड क्र.२५६ सिरोंचा वनविभागाचे राखीव वनातील बैलबंडीच्या चाकोरीवरुन गस्त करीत असताना वनतस्कर बैलबंडीने साग लठ्यांची वाहतूक करीत असल्याचे आढळून आले, त्यावेळी अंधार असल्याने तस्करांनी वनकर्मचाऱ्यांवर अंधाधुंद दगडांचा मारा केला.

(२) हे खरे आहे.

सदर प्रकरणी वनतस्करांनी अंधाराचा फायदा घेऊन वनकर्मचाऱ्यांवर अंधाधुंद दगडफेक केल्याने वनपरिक्षेत्र अधिकारी सिरोंचा यांनी वनकर्मचाऱ्यांचे व स्वत:चे बचावाकरिता ९mm च्या पिस्तूल मधून ०३ राऊंड हवेत फायर केले. त्यामुळे बैलबंडीसह माल तिथेच सोडून अंधाराचा फायदा घेत वनतस्कर घटनास्थळावरुन पसार झाले.

(३) हे खरे आहे.

वन विभागाच्या पथकाने दिनांक २५/०३/२०२३ रोजी वन गुन्हा नोंदवून घटना स्थळावर १४ बैल व ७ बैलगाड्या जप्त करण्यात आल्या, तसेच साग लठ्ठे ३१ नग ३.५२८ घ.मी. रुपये २,५४,८४२/- किंमतीचा माल जप्त करुन वनपरिक्षेत्र, आसरअल्ली डेपोमध्ये वाहतूक करुन जप्त केलेला माल नियतक्षेत्र वनरक्षक, आसरअल्ली यांचेकडे जमा करण्यात आला.

(४) माहे जानेवारी, २०२२ ते डिसेंबर, २०२२ पर्यंत आंतरराज्यीय तस्करीकरिता अवैध साग तोडीचे एकूण १४ वनगुन्हा प्रकरणे घडले आहेत त्यापैकी ४ प्रकरणामध्ये १६ आरोपी पकडण्यात आले आहे. त्यापैकी ४ आरोपीविरुध्द फॉरेस्ट कस्टडी घेण्यात आली होती. वरील सर्व प्रकरणामध्ये भारतीय वन अधिनियम १९२७ अंतर्गत वनगुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

(५) अवैध वृक्षतोडीवर आळा घालण्यासाठी संवेदन ठिकाणी तपासणी नाके, वनसंरक्षण कॅम्प उभारुन गस्तीपथक मार्फत वेळीवेळी संवेदनशिल क्षेत्रात नियमित प्रतिबंधात्मक गस्त करण्यात येत आहे. अवैध वृक्षतोड प्रकरणी सापडलेल्या आरोपीला अटक करुन त्यांचेकडील अवैध माल जप्त केला जातो व त्याअनुषंगाने भारतीय वन अधिनियम, १९२७ अंतर्गत आरोपीवर वनगुन्हा नोंदवून प्रकरण न्यायालयात दाखल केले जाते. तसेच आरोपीकडून नियमानुसार शासन संपत्तीची नुकसान भरपाई म्हणून दंड वसूल करण्यात येतो.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील नागला बंदर किल्ला नामशेष झाला असल्याबाबत

**(१८) * १९५५३ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील नागला बंदर येथील ऐतिहासिक किल्ला हा दगड खाणी आणि क्रशर मशीन चालकांनी नामशेष केल्याची कबुली पुरातत्व व वास्तु संग्रहालय संचालनालयाकडून देण्यात आली असून नागला बंदर किल्ला हे राज्य संरक्षित स्मारक नसल्याने महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुरातन वास्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियमान्वये किल्ल्याच्या संरक्षणाबद्दल कारवाई करण्यास पुरातत्व विभागाला अडचणी येत असल्याची बाब माहे एप्रिल २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागला बंदर किल्ल्याच्या आसपासच्या जमिनीवर परवानगी न घेता तसेच पर्यावरण विभागाच्या कुठल्याही नियमांचे पालन न करता खडी क्रशर मशीन बसविण्यात आली असून, हा डोंगर फोडून दगड व त्याचा बारीक चुरा सर्रास विकला जात असताना पर्यावरण विभागाचे त्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खडी क्रशर प्लांटमुळे भाईंदर पाडा गाव, लोढा कॉम्प्लेक्स या परिसरातील अनेक सोसायट्यांमधील रहिवाशांना डोळे चुरचुरणे, घसा खवखवणे व श्वसनाचा त्रास होवून विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने या किल्ल्याच्या पुनरुज्जीवनासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय हे खरे आहे.

नागला बंदर किल्ला हा राज्य संरक्षित स्मारक नाही. हा महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुरातनवस्तुशास्त्र विषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६० मधील तरतूदीनुसार राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याच्या निकषात बसत नाही, त्यामुळे पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाला याबाबत कार्यवाही करण्यास मर्यादा आहेत.

(२) नागला बंदर येथे खडी क्रशर मशीन उद्योगाचे क्लस्टर आहे. या ठिकाणी ११ खडी क्रशर मशीन कार्यरत आहे. या उद्योगांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र घेतलेले आहे. या पूर्वी काही उद्योगांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संमतीपत्रातील अटी व शर्तींचे पालन न केल्याने दोषी आढळलेल्या उद्योगांवर प्रस्तावित निर्देश व अंतरिम आदेश बजावण्यात आले आहे. मौजे आवळे व भाईंदरपाडा, ता.ठाणे येथील विक्रेता परवानाधारकांना एका कॅलेंडर वर्षाकरिता दिनांक ३१/१२/२०२३ पर्यंत किंवा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संमतीपत्राची मुदत दिनांक ३१/१२/२०२३ पूर्वी संपुष्टात येत असल्यास सदर दिनांकापर्यंत महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील नियम ७१(३)(क) नुसार विक्रेता परवाना देण्यात आला आहे.

(३) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासनाच्या “मागेल त्याला घरपोच वाळू” या निर्णयाबाबत

**(१९) * १९७५८ श्री.अरुण लाड, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मागेल त्याला घरपोच वाळू धोरण जाहीर केले असून ६०० रुपयांत ग्राहकाला घरपोच वाळू मिळणार असून त्यासाठी वाळू डेपो निर्मितीकरिता शासनाने १४ अटी घातल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोरणात्मक निर्णयानुसार, कृष्णा नदीतून सांगली बंधारा ते डिग्रज बंधारा या पट्टयात वाळू उपसा करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला असल्याचे माहे एप्रिल,२०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नदीतून वाळू उपसा संदर्भात केंद्रीय हरित न्यायाधिकरण व मा.सर्वोच्च न्यायालयाने वाहत्या नदीतून यंत्राद्वारे वाळू उपसाविरोधात दिलेला निकाल तसेच कृत्रिम वाळूचा पर्याय १०० टक्के उपयुक्त व फायदेशीर ठरलेला असताना नदीतील घरपोच वाळूचा निर्णय घेण्यामागील कारणे काय आहेत

(४) असल्यास, वाळू उपसाच्या परिणामाचा पर्यावरणीय दृष्टीने अभ्यास करावा व तद्नंतर निर्णयाची अंमलबजावणी करावी अशी जनतेची मागणी असून त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) राज्यातील नागरिकांना बांधकाम योग्य वाळू स्वस्त दराने उपलब्ध करुन देणे तसेच अनाधिकृत उत्खननास आळा घालण्याच्या उद्देशाने शासनामार्फत वाळू/रेतीचे उत्खनन, साठवणूक व विक्री व्यवस्थापन करण्यासाठी प्रायोगिक तत्वावर १ वर्षासाठी दिनांक १९/०४/२०२३ च्या शासन निर्णयान्वये सुधारित वाळू धोरण निर्गमित केले आहे. यामध्ये वाळू गट निश्चिती, उत्खनन, वाहतूक, साठवणूक व विक्री अशा विविध टप्प्यावर कार्यवाही करण्याबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.तसेच, यामध्ये वाळूची निर्मिती, वाळू उपसा, वाळू उपलब्धता याचा अभ्यास करुन पर्यावरण अनुमतीसाठी प्रस्ताव सादर केला जातो.

सदर शासन निर्णयातील प्रकरण- एक II](२)(१०) मध्ये राज्यातील पूर परिस्थितीचा धोका कमी करणे, नदीचा प्रवाह पूर्ववत/सुरळीत करणे यासारख्या बाबींसाठी जलसंपदा विभागाने नदी पात्रातील काही गट/स्थळ निश्चित केल्यास अशा ठिकाणाहून गाळ, गाळ मिश्रित वाळू काढण्याबाबत जलसंपदा विभाग जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करु शकेल, अशी तरतूद आहे.

सांगली येथील कृष्णा नदी पात्रातून कोल्हापूर टाईप बंधारा ते नवीन बायपास पूलापर्यंत गाळ काढण्याची परवानगी मिळण्याबाबत प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने शासन निर्णय महसूल व वन विभाग दिनांक १९/०४/२०२३ नुसार कार्यवाही करण्याबाबत जलसंपदा विभागाने कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना दिनांक १२/०७/२०२३ च्या पत्रान्वये कळविले आहे.

-----------------

## सालबर्डी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथे शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना करण्याबाबत

**(२०) * १९२९१ श्री.एकनाथराव खडसे : तारांकित प्रश्न क्रमांक १६१६७ ला दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत नाशिक विभागात एक तसेच जळगाव, अमरावती आणि अकोला विभागात एक याप्रमाणे दोन नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याची घोषणा तत्कालीन मा.मंत्री, वित्त यांनी सन २०१६ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सालबर्डी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील गट नं. ३३, ३५,५५,५६, व ५९ अशी एकूण ३३.७१ हे.आर. एवढी जमीन सदर महाविद्यालयाच्या स्थापनेसाठी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांना उपलब्ध करुन दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सालबर्डी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव,) येथे शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय.
(२), (३) व (४) मौजे सालबर्डी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) येथे शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याऐवजी मौजे सावखेडा, ता.जि.जळगाव येथे पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना पीक विमा मिळत नसल्याबाबत

**(२१) * १९१०२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांना सन २०२० मधील पीक विमा रक्कम देण्यात येत नसल्याबाबत कृषी खात्याचे प्रधान सचिव यांनी केंद्रीय कृषी मंत्रालयाला पत्रामार्फत पीक विमा कंपन्याविरूध्द तक्रार नोंदविली आहे, हे खरे आहे काय,
(२) राज्यात अवकाळी, गारपीट, अतिवृष्टीमुळे व सततच्या पावसामुळे नुकसान झालेल पिकांचे पंचनामे करुनही पीक विम्याची रक्कम अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परभणी येथील सुमारे ८८ हजार शेतकऱ्यांनी पीक विमा मिळवण्यासाठी राज्य शासन व विमा कंपनी यांच्याविरूध्द न्यायालयात दावे दाखल केलेले आहेत, तसेच केंद्र शासनाने विमा कंपन्यांना भरपाईची रक्कम अदा करण्याचे आदेश न दिल्याने पीक विमा कंपन्यांनी दोन हजार कोटी रुपयांची पीक विमा रक्कम ही स्वत:कडे प्रलंबित ठेवली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात अवकाळी, गारपीट, अतिवृष्टीमुळे व सततच्या पावसामुळे नुकसान झालेल्या पिकांच्या पीक विम्याची रक्कम अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

खरीप २०२० हंगामात स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे विमाधारक शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान झाले. मात्र कोविड २०१९ ची लाक्षणिक परिस्थितीमध्ये विविध कारणांमुळे काही विमाधारक शेतकरी संबंधित विमा कंपनीस नुकसानीबाबत सूचना देऊ शकले नाहीत. यास्तव पिकांच्या नुकसानीबाबत NDRF मध्ये झालेले पंचनामे गृहीत धरून शेतकऱ्यांना विमा नुकसान भरपाई देणेबाबत राज्य शासनाने विमा कंपन्यांकडे आग्रही भूमिका ठेवली आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यात राबविण्यात येत आहे. त्यामुळे उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व विमा कंपन्यांना आदेशित करणेबाबत केंद्र शासनास कळविण्यात आले आहे. याअनुषंगाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.

दिनांक ०७ जुलै, २०२३ अखेर खरीप हंगाम सन २०२२ अंतर्गत एकूण रक्कम रुपये ३१८०.३६ कोटी इतकी नुकसान भरपाई निश्चित झाली असून त्यापैकी रुपये ३१४१.१९ कोटी नुकसान भरपाईचे वाटप विमा कंपन्यांमार्फत करण्यात आले आहे. उर्वरित नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे. तसेच रब्बी हंगाम २०२२-२३ अंतर्गत एकूण रक्कम रुपये २८.०३ कोटी इतकी नुकसान भरपाई निश्चित झाली असून त्यापैकी रुपये ११.०१ कोटी नुकसान भरपाईचे वाटप विमा कंपन्यांमार्फत करण्यात आले आहे. उर्वरित नुकसान भरपाई निश्चितीची व वाटपाची कार्यवाही सुरु आहे.
(३) होय, हे अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत खरीप २०२० मध्ये परभणी जिल्ह्यात एकूण ७,०१,४९३ शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला होता.पैकी १,४७,५२४ शेतकऱ्यांची रक्कम रुपये १०८.१४ कोटी नुकसान भरपाई निश्चित करण्यात आली होती व ८०,८७४ शेतकऱ्यांना रक्कम रुपये ५२.०४ कोटी वितरित करण्यात आली असून रक्कम रुपये ५६.१० कोटी नुकसान भरपाई वाटप प्रलंबित आहे.

रब्बी हंगाम २०२०-२१ मध्ये एकूण ५६,१५० शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग नोंदवला होता.पैकी १२,१९२ शेतकऱ्यांची रक्कम रुपये ६.०० कोटी नुकसान भरपाई निश्चित करण्यात आली असून अद्याप वाटप पूर्णत: प्रलंबित आहे.
(४) खरीप २०२० हंगामासाठी, विमा कंपन्यांना NDRF अंतर्गत केलेले पंचनामे गृहीत धरुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करणेबाबत कळविण्यात आले असून याबाबत त्यांचेकडे पाठपुरावा सुरु आहे. तसेच सदर योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात राबविण्यात येत असल्याने याबाबत विमा कंपन्यांना निर्देश देण्याबाबत केंद्र शासनास कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) तालुक्यातील मिठागरे नामशेष होत असल्याबाबत

**(२२)** * **१९६९० श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील वाढत्या औद्योगिकीकरणामुळे तसेच जे.एन.पी.टी. आणि सिडकोने तेथील जमिनी संपादित केल्यानंतर खाडीपट्ट्यांवर मोठ्या प्रमाणात टाकण्यात येणाऱ्या भरावामुळे मिठागरांची शेती धोक्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उरण तालुक्यातील प्रामुख्याने बेल पाडा सोनारी फुंडे, पाणजे, डोंगरी, जसखार तसेच पूर्व भागात खोपटे आवरे, कोपरोली, मोठीजुई, गोठणे या मिठागरांवर हजारो कामगार मीठ गोण्यांमध्ये भरणे, गोण्या शिवणे, ट्रक किंवा बोटीमध्ये माल चढविणे इ. काम करून आपला उदरनिर्वाह करत होते, परंतु सदर १०४ मिठागरांपैकी केवळ दोन ठिकाणीच उत्पादन घेतले जात असल्यामुळे हजारो कामगारांचा रोजगार बुडाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मिठागरे तसेच पारंपारिक मिठाची शेती जपण्याबाबत तसेच उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) उरण तालुक्यातील जासई मंडळातील मौजे सोनारी येथील मिठागरे क्षेत्र ४६७-२४.६५ हे.आर व मौजे जासखार येथील मिठागरे क्षेत्र १४४-७०.२० हे.आर तसेच उरण मंडळातील काळाधोंडा, पाणजे, डोंगरी, फुंडे, नवघर, भेंडखळ, बोकडविरा या गावांतील मिठागरांचे एकूण क्षेत्र ३२३-१७.६७ हे.आर आहे. औद्योगिकीकरणासाठी जे.एन.पी.टी. व सिडको यांचेमार्फत मिठागरांच्या जमिनी संपादित झालेल्या आहेत.

मात्र उरण तालुक्यातील पूर्वेकडील कोप्रोली मंडळामध्ये जे.एन.पी.टी. व सिडकोमार्फत मिठागरांच्या क्षेत्रावर भराव करण्यात आलेला नाही. सद्य:स्थितीत सदरची मिठागरे अद्याप पूर्ववत सुरु आहेत. तथापि, मीठ उत्पादनामधील अनिश्चितता तसेच मालकी हक्काबाबत होणाऱ्या वादांमुळे मिठाचे उत्पादन थांबले असल्याने त्याचा परिणाम मीठ गोण्यांमध्ये भरणे, गोण्या शिवणे, ट्रक किंवा बोटीमध्ये माल चढवणे इत्यादी. काम करुन आपला उदरनिर्वाह करीत असलेल्या कामगारांच्या रोजगारावर झालेला आहे. मिठागरांच्या मिळकती या केंद्र शासनाच्या अखत्यारित असून मीठ उत्पादनाकरिता शासकीय जमीन मिळणेबाबत अर्ज प्राप्त झाल्यास शासनाच्या प्रचलित धोरणानुसार जमीन हस्तांतरीत करण्याचे कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## अमरावती जिल्ह्यात अवैधरित्या वाळुचा उपसा करणाऱ्या वाळु तस्करांकडून हल्ले होत असल्याबाबत

**(२३)** * **१९४२७ श्री.प्रविण पोटे-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १७६३९ ला दिनांक २ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्या वाळू तस्करांवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या महसूल विभागाच्या पथकांवर वाळू तस्करांकडून हल्ले वाढले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाळू तस्करांकडून सरकारी नियम न जुमानता अवैधरित्या वाळू उपसा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्या व्यावसायिकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) अमरावती जिल्ह्यातील अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा स्तरीय पथकाव्दारे करण्यात आलेल्या तपासणीमध्ये धामणगाव रेल्वे-मंगरूळ दस्तगीर-गोकुळसरा-दिघी महल्ले या रस्त्यावर गौण खनिजाची अवैध वाहतूक आढळून आल्याने व पथकावर हल्ला केल्याने दिनांक ३०/०५/२०२३ रोजी मंगरूळ-दस्त पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ०२८८/२०२३ भादवि कलम ३५३, ३७९, ३४१, ३४ व पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ च्या कलम ९ व १५ आणि दिनांक २१/०४/२०२३ रोजी चांदुर बाजार पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ०३३५/२०२३ भादवि कलम २७९, ३७९, ३०७, ३५३, ५०४, ५०६, ३४ व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४८(७) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

-----------------

## फुलंब्री (जि.औरंगाबाद) येथील मंजूर विहिरी प्रकरणी लाच मागणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(२४) * २००७४ श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेवराई पायगा (ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद) या गावासाठी शासकीय योजनेंतर्गत २० विहिरी खोदाईच्या मागील वर्षी मंजूर केलेल्या प्रस्तावावर पुढील कार्यवाही करण्यासाठी गटविकास अधिकारी यांचेसह अन्य अधिकारी/कर्मचारी गरीब शेतकऱ्यांकडून १२ टक्के रक्कम मागणी करीत असून, पुर्तता न झाल्यास शेतकऱ्यांची अडवणूक करीत असल्याबाबत तेथील सरपंचानी फुलंब्री पंचायत समिती प्रशासन तसेच जिल्हा परिषद प्रशासनाकडे तक्रारी व आंदोलन करुन गटविकास अधिकारी यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्याची मागणी माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फुलंब्री (जि.औरंगाबाद) येथील पंचायत समितीमध्ये सिंचन विहीर व गोठ्याच्या मंजुरीकरिता पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाच्या ७०० नस्त्यांवर मागील वर्षापासून कोणतीही कार्यवाही होत नसल्यामुळे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लोकप्रतिनिधींनी पंचायत समितीच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन केल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पंचायत समितीमध्ये सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांबाबत कार्यवाही करण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन सादर करण्यात आलेले सिंचन विहीर व गोठ्याच्या प्रस्तावांना मंजुरी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

फुलंब्री येथील पंचायत समितीमध्ये सिंचन विहीर ३८८ व गोठे २१८ असे एकूण ६०६ इतके प्रस्ताव कार्यवाहीसाठी प्राप्त झाले होते. मग्रारोहयो अंतर्गत ग्रामपंचायतीचे वैयक्तीक सिंचन विहीर व गोठे प्रस्तावांबाबत मा.आ. श्री.हरीभाऊ (नाना) बागडे यांनी दिनांक २२/०६/२०२३ रोजी पंचायत समिती फुलंब्री येथे ठिय्या आंदोलन केले.
(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून चौकशीच्या अनुषंगाने संबंधित गटविकास अधिकारी यांचेवर शिस्तभंगविषयक कारवाई करण्यासाठी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे.

वैयक्तीक लाभाच्या संचिका तपासणी, तांत्रिक मान्यता, कामाचा सांकेतांक क्रमांक तयार करणे व पात्र लाभार्थ्यांना प्रशासकीय मान्यता देणेबाबतची कार्यवाही करणेकरिता पैठण, औरंगाबाद, कन्नड, खुलताबाद येथील सहायक कार्यक्रम अधिकारी, तांत्रिक अधिकारी व संगणक परिचालक यांना बोलवून संबंधित संचिकांची तपासणी व पडताळणी करण्यात आली. पात्र असलेल्या २५६ वैयक्तीक सिंचन विहीरी व १८० गोठ्यांच्या प्रस्तावांना गटविकास अधिकारी पंचायत समिती फुलंब्री यांच्या स्तरावरुन शासकीय मान्यता देण्यात आलेली आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ज्येष्ठ कलाकारांचे मानधन दर महिन्याला देणेबाबत

**(२५) * २०५०१ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून राज्यातील ज्येष्ठ कलाकारांना मासिक मानधन देण्यात येत असून पात्र असलेल्या कलाकारांना मासिक मानधन न मिळता ६ महिन्यांतून एकदाच एकत्रित मानधन दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील ज्येष्ठ लोक कलाकारांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे त्यांना दर महिन्याला नियमित मानधन द्यावे अशी मागणी राज्यातील विविध संघटना व ज्येष्ठ लोक कलाकारांनी वेळोवेळी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील मागणीबाबत ज्येष्ठ लोक कलाकारांना मासिक मानधन देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) अशी वस्तुस्थिती नाही.

सांस्कृतिक कार्य विभागाच्या माध्यमातून "राजर्षी शाहू महाराज वृध्द साहित्यिक व कलावंत मानधन" या योजनेमार्फत पात्र कलावंत व साहित्यिक यांना 'अ', 'ब', व 'क' या श्रेणीनुसार अनुक्रमे रुपये ३१५०/-, २७००/- व २२५०/- दरमहा असे मानधन दिले जाते.

(२), (३) व (४) निधी वितरणाच्या प्रक्रीयेत काही वेळी विलंब लागल्यास मानधन नियमित देण्याबाबत विनंत्या शासनाकडे प्राप्त होतात. त्यामुळे कोणत्याही तांत्रिक अडचणीशिवाय निधी वितरीत करण्याची कार्यपध्दती स्विकारण्याची बाब विचाराधीन आहे.

-----------------

## कुंडी निगुडवाडी (ता.संगमेश्वर जि.रत्नागिरी) येथील निवृत्त स्वातंत्र सैनिकाला देण्यात आलेली वतन जमीन अदानी ट्रान्समिशन कंपनीने परस्पर खरेदी केल्याबाबत

**(२६) * २०५५३ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंडी निगुडवाडी (जि.रत्नागिरी) येथील निवृत्त स्वातंत्र सैनिकाला राज्य शासनाकडून वतन म्हणून देण्यात आलेली ७६ एकर जमीन अदानी ट्रान्समिशन कंपनीने मूळ मालकांना त्याचा मोबदला न देता परस्पर खरेदी केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निर्दशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुचांबे ते खडीओझरे या सुमारे ५० कि.मी. अंतरातील जमिनी परस्पररित्या मूळ मालकांना पूर्वकल्पना न देताच शासनाकडून परस्पर उद्योजकांना विक्री केल्या जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी करुन सदर जमीन मूळ मालकांना परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच मूळ मालकांना विश्वासात न घेता परस्पर जमिनी विक्री करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) मौजे कुंडी व निगुडवाडी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील गा.न.नं. ७/१२ व फेरफार यांचे अवलोकन करता निवृत्त स्वातंत्र सैनिक यांना वतन म्हणून ७६ एकर जमीन दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे मूळ मालकांना त्याचा मोबदला न देता त्यांच्या जमीन मिळकती परस्पर खरेदी अथवा विक्री करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

संगमेश्वर तालुक्यातील व कुचांबे ते खडीओझरे या सुमारे ५० कि.मी. अंतरातील शेतकऱ्यांच्या जमिनी अदानी ट्रान्समिशन कंपनीस किंवा इतर कोणत्याही उद्योजकांना परस्परित्या मूळ मालकांना पूर्वकल्पना न देता शासनाकडून खरेदीने दिल्याबाबत नोंदी अभिलेखात दिसून येत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे (ता.दौंड) येथील भीमा पाटस सहकारी साखर कारखान्यामध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२७) * १९५३४ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील भीमा पाटस सहकारी साखर कारखान्याच्या लेखापरिक्षण अहवालात १६० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कारखान्यांतील कामगारांचे सुमारे ३५ कोटी रुपये देणे थकीत असून तसेच आर्थिकदृष्ट्या डबघाईस आलेल्या या कारखान्यांवर पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि राज्य सहकारी बँकेचे सुमारे १८० कोटींहून अधिक कर्ज थकीत असल्याचेदेखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जबाबदार असणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) हे खरे नाही.

भीमा पाटस सहकारी साखर कारखाना लि.दौंड, जि.पुणे या सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२१-२२ अखेरच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालात कुठलाही गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. तर सन २०२२-२३ चा लेखापरिक्षण अहवाल अद्यापि पूर्ण झालेला नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सदर कारखान्याची सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी आदेश निर्गमित केलेले आहेत. त्याकरिता चौकशी अधिकारी विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था, (साखर), पुणे यांची नेमणुक केलेली आहे. वरीलप्रमाणे चौकशी पूर्ण करण्यासंदर्भात कार्यवाही सुरू आहे. चौकशीअंती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात वन विभागातील बदल्यांमध्ये गैरप्रकार झाल्याबाबत

**(२८) * २०५८० श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वन विभागातील ३९ सहाययक वनसंरक्षक (एसीएफ) यांच्या दिनांक ३१ मे, २०२३ रोजी बदल्या करण्यात येऊन, १२ एसीएफ यांना मुदतवाढही देण्यात आली होती तसेच सुमारे २०० पेक्षा जास्त वनपरिक्षेत्र अधिकारी (आरएफओ) यांच्या बदल्यांमध्ये गैरप्रकार झाले असल्याची तक्रार ४ ते ५ मा.लोकप्रतिनिधीं यांनी, मा.वने मंत्री यांचेकडे लेखी स्वरुपात केली असल्याचे दिनांक ५ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी मा.प्रधान सचिव, वने यांनी प्रधान मुख्य वनसंरक्षक व अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांना वस्तुस्थितीबाबत विचारणा केली असतानाही त्यांचेकडून अद्याप कोणतीही माहिती शासनास प्राप्त झाली नसल्याचे तसेच दरम्यानच्या काळात मा.मंत्री, वने यांनी बदल्यांच्या प्रकरणांस स्थगिती देऊन चौकशीचे आदेश दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे. चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या नियतकालिक बदल्यांच्या निर्गमित करण्यात आलेल्या आदेशाबाबत काही लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेल्या तक्रारींची तपासणी होणे आवश्यक असल्याने वनपरिक्षेत्र अधिकारी संवर्गाचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) व मुख्य वनसंरक्षक (प्रा.)/वनसंरक्षक (प्रा.) यांच्या स्तरावरून निर्गमित बदलीच्या आदेशांना दिनांक ०२/०६/२०२३ च्या शासन पत्रान्वये स्थगिती देण्यात आली व प्राप्त तक्रारींबाबत अहवाल सादर करण्यास दिनांक ०२/०६/२०२३ व दिनांक ०९/०६/२०२३ च्या शासन पत्रान्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) यांना कळविण्यात आले होते. त्यास अनुसरून त्यांनी दिनांक ०५/०६/२०२३, दिनांक १५/०६/२०२३ व दिनांक २०/०६/२०२३ च्या पत्रान्वये शासनास सादर केलेले अहवाल विचारात घेऊन वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या बदली आदेशास देण्यात आलेली स्थगिती दिनांक ३०/०६/२०२३ च्या शासन पत्रान्वये उठविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कांजूर (मुंबई) येथील मेट्रो कारशेडसाठी निवडलेल्या जागेबाबत

**(२९)** * **१९७७१ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कांजूर (मुंबई) येथील मेट्रो कारशेडसाठी निवडलेली जागा मिठागराचीच असल्याचा दावा केंद्र शासनाच्या अखत्यारितील मीठ अधिक्षकांनी केला असून, दिनांक ४ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास जमिनीचे सर्वेक्षण करण्यापासून राज्य शासनाला रोखले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(३) असल्यास, मेट्रो कारशेडसाठी पर्यायी जागेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या विनंतीनुसार, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाच्या दिनांक १७/०४/२०२३ रोजीच्या आदेशानुसार, मेट्रो मार्गिका-२ च्या कारडेपो व अनुषंगिक वापराकरिता मौ. कांजूर, ता.कुर्ला, स.नं.२७५, न.भू.क्र.६५७-अ मधील १५ हेक्टर जमिनीचा आगाऊ ताबा नगर भूमापन अधिकारी, मुलुंड यांनी दिनांक १९/०४/२०२३

रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना दिला आहे. तद्नंतर उपनमक आयुक्त यांनी दिनांक २१/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदर जागा केंद्र सरकारची असून उक्त जागेत सर्वेक्षण करण्यास हरकत असलेबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयास कळविले होते.
(२) विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे दिनांक २१/०५/२०१५ रोजीचे आदेश आणि तत्का. मा.मंत्री (महसूल) यांचे दिनांक ०१/११/२०१८ रोजीचे आदेश यानुसार सदर जमिनीची मालकी महाराष्ट्र शासनाची निश्चित झालेली आहे. सदर जमीन राज्य शासनाच्या मालकीची असल्यामळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला आगाऊ ताबा देण्याची केलेली कार्यवाही योग्य असल्याबाबत उपनमक आयुक्त यांना जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी कळविलेले आहे.
(३) व (४) प्रश्नांकित जमीन राज्य शासनाच्या मालकीची असल्यामुळे प्रश्न उद्भत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथील ऐतिहासिक पुतळा बारव पुनर्निर्माण व परिसर विकासाचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(३०)** * **१९६६० प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक १७६५९ ला दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) येथील ऐतिहासिक पुतळा बारव पुनर्निर्माण व परिसर विकासासाठी सप्टेंबर, २०२१ मध्ये भारतीय पुरातत्त्व विभागाकडून स्थानिक उपविभागीय अधिकाऱ्यांकडे ४० गुंठे जमीन संपादनाचा प्रस्ताव सादर करूनही मागील एक ते दोन वर्षांपासून उक्त प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बारव विकसित झाल्यास शहराच्या पर्यटनाला मोठी चालना मिळणार असतानाही स्थानिक प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) या ऐतिहासिक स्थळाच्या विकासासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) सिंदखेडराजा जि.बुलढाणा येथील केंद्रीय संरक्षित स्मारक पुतळा बारव करिता ४२०० चौ.मी. इतकी खाजगी मालकीची जमीन थेट वाटाघाटीद्वारे खरेदीबाबतचा प्रस्ताव केंद्रीय पुरातत्त्व विभाग, नागपूर यांनी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना दिनांक २८/११/२०२२ रोजी सादर केला.

त्यानुसार मूल्यांकन कार्यवाहीनंतर सदर प्रस्तावामध्ये भूधारकांची समंती पत्रे नसणे, जमिनीच्या अधिकार अभिलेखाबाबत शोध अहवाल नसणे इत्यादी त्रुटी पूर्तता करण्याबाबत भूसंपादन संस्था केंद्रीय पुरातत्त्व विभाग, नागपूर यांना जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी दिनांक २७/१२/२०२२ व दिनांक १५/०२/२०२३ चे पत्रान्वये कळविण्यात आले.

परंतु, सदर पूर्तता करणे शक्य न झाल्याने भूसंपादन संस्था केंद्रीय पुरातत्त्व विभाग, नागपूर यांनी दिनांक १८/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणी थेट खरेदीऐवजी भूसंपादन अधिनियम, २०१३ नुसार जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना भुसंपादन प्रस्ताव सादर केला आहे. तद्नंतर, जिल्हाधिकारी यांनी दिनांक १२/०६/२०२३ रोजीच्या आदेशान्वये उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांना भूसंपादनासाठी प्राधिकृत केले आहे. त्यानुसार भूसंपादन प्रक्रिया चालु आहे.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबे रोजगार नसल्यामुळे स्थलांतरित होत असल्याबाबत

**(३१) * १९२५८ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सचिन अहिर : तारांकित प्रश्न क्रमांक १७०८१ ला दिनांक २ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड, डहाणू, जव्हार, मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील दुर्गम भागातील आदिवासी कुटुंबांना रोजगार हमी योजनेंतर्गत रोजगार उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोजगारासाठी हजारो आदिवासी आपल्या कुटुंबासह शहरातील पालघर, भिवंडी, ठाणे, वसई-विरार, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली तसेच थेट गुजरात अशा मोठ्या शहरात स्थलांतरित होत असल्याची बाब दिनांक ४ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्ह्यातील आदिवासी ग्रामीण भागात रोजगार हमी योजनेची कामे सुरू करण्याबाबत तसेच आदिवासी कुटुंबांचे स्थलांतरण इतर शहरात रोखण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत पालघर जिल्ह्यात सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये आजरोजीपर्यंतचा तालुकानिहाय तपशील:-

| तालुका | कामे पुरविलेल्या मजुरांची संख्या | झालेली मनुष्यदिन निर्मिती | शेल्फवरील कामाची संख्या |
|---|---|---|---|
| विक्रमगड | ४८,६६० | ७,३४,५३२ | ७५६ |
| डहाणू | ३३,४८८ | ८०,६६३ | ५४६ |
| जव्हार | ३३,६०१ | ५,३२,५७५ | १,३४८ |
| मोखाडा | २४,८७१ | २,८७,६३२ | १,०३४ |

पालघर जिल्ह्यातील गावात, शेतावर वाडी/ पाड्यांवर शिवार फेरीचे नियोजन करुन कामांची निवड केली जाते. ग्रामसभेत लोकांना योजनेबाबत माहिती दिली जाते व कामांचे वाचन केले जाते. सार्वजनिक ठिकाणी शेल्फवरील कामांची यादी प्रसिध्द केली जाते. पालघर जिल्ह्यात मनरेगा योजनेंतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात रुपये १२,९५९.१९ लक्ष इतका निधी मजूरांच्या मजुरीवर खर्च झालेला आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील लेखा शाखेत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३२) * १९९६९ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालय, लेखा शाखेतील रोखपाल तथा अव्वल कारकून यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध बँक खात्यातून सुमारे २५ कोटी ९१ लक्ष तसेच मुख्यमंत्री सहायता निधीमधील कोट्यवधी रुपयांचा अपहार केला असल्याने रोखपाल तथा कारकून व इतरांविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे हे सन २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई वित्त नियम व महाराष्ट्र कोषागार नियमानुसार कार्यालय प्रमुख तथा जिल्हाधिकारी यांनी महिन्यातून किमान एक वेळेस रोकड वही, बँक खाते वही व रोख रक्कम यांची पडताळणी करून शेरा/अहवाल रोकड वहीत लिहिणे बंधनकारक असताना देखील तत्कालीन जिल्हाधिकारी यांचे कार्यकाळात ८४ महिने पडताळणी झाली नसल्याची बाब निदर्शनास आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद व महसूल विभाग, मंत्रालय मुंबई या कार्यालयात वर्ग-१ लेखा व वित्त अधिकारी यांची पदस्थापना असतानाही त्यांचेमार्फत त्या त्या वेळीच मा.विभागीय आयुक्त व मा.अति.मुख्य सचिव (महसूल) यांनी लेखा परीक्षण केले नसल्याने तत्कालीन जिल्हाधिकारी यांचे समवेत त्यांचा देखील या गैरव्यवहारात सहभाग आहे असे प्राथमिक दृष्ट्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गैरव्यवहाराची रक्कम मोठी असल्याने व मा.अति.मुख्य सचिव (महसूल), मा.विभागीय आयुक्त, मा.जिल्हाधिकारी तसेच आहरण व संनियंत्रण अधिकारी यांच्या सहमतीने सदरचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आला असून त्यांची अप्पर पोलीस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेमार्फत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सदर अपहाराच्या अनुषंगाने मनोज नागनाथ फुलेबोयणे व इतर ४ यांचेविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला असून त्यांचेविरुध्द आर्थिक गुन्हे अन्वेषण, पोलीस अधीक्षक, लातूर यांचे विशेष पथकामार्फत पोलीस तपास सुरु आहे. प्रकरण मा.न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

मुंबई वित्तीय नियम, १९५९ आणि महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम व शासनाने वेळोवेळी परिपत्रक/पत्राव्दारे दिलेल्या सूचनांचे संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी काटेकोरपणे पालन न करणे, कामकाज करताना अधिक सतर्कता न बाळगणे व प्रभावी नियंत्रण न ठेवणे याबाबी सदर अपहार प्रकरणाची सखोल चौकशी केलेल्या २ समित्यांनी निदर्शनास आणून दिलेली आहे. त्याअनुषंगाने संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांचेविरुध्द संयुक्त विभागीय चौकशी प्रस्तावित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

या व्यतिरिक्त तपासणी अहवालानुसार इतर कोणतेही अधिकारी/कर्मचारी हे दोषी असल्याचे दिसून आले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नागपंथी डवरी गोसावी समाजाच्या विद्यार्थ्यांना जातीचे दाखले तसेच शिष्यवृत्ती मिळण्याबाबत

**(३३) * १९७३८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागपंथी डवरी गोसावी समाजातील विद्यार्थ्यांना जातीचे दाखले मिळणेसाठी शासनामार्फत १९६० पूर्वीचा पुरावा मागत असल्याचे परंतु सदरील समाज हा अशिक्षित व मागास असून त्यांच्याकडे पूर्वीच्या जातीच्या नोंदीत त्रुटी असल्याचे माहे मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने सदरची अट रद्द करुन संबंधित समाजाच्या व्यक्तींना पोलीस पाटील/तलाठी, ग्रामसेवक/सरपंच/स्वत:चे ॲफिडेव्हीट अथवा समाज संघटना यांच्या शिफारशीनुसार दाखला मिळण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,

(३) असल्यास, एस.एस.सी. परीक्षेसाठी समाजकल्याण विभागामार्फत दिली जाणारी परीक्षा फी कायमस्वरुपी मिळावी व समाजकल्याण विभागामार्फत विद्यार्थ्यांना विना अट शिष्यवृत्ती मिळावी, अशी मागणी अखिल भारतीय नाथपंथी समाज महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष यांनी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनस्तरावरुन नाथपंथी डवरी गोसावी समाजास सर्वतोपरी न्याय मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) नागपंथी डवरी गोसावी या भटक्या जमातीच्या नागरिकांना कागदोपत्री रुढी पध्दतीने चुकीच्या नोंदी लागल्याने जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र मिळत नसल्याने अडचणी येत असल्याबाबत व नाथपंथी, भराडी, गोंधळी नाथबाबा, नाथबुवा, डवरी, नाथजोगी, नाथपंथी डवरी गोसावी, जोगी अशा नावाचा उल्लेख शासनाच्या यादीत समाविष्ट नसल्याने अडचणी येत असल्याबाबतचे पत्र शासनास प्राप्त झाले आहे.

(२) महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० मध्ये "अर्जदार, पोट-नियम (२) चे नमूद केलेला कोणताही दस्तऐवज सादर करण्यास असमर्थ असेल तर अशा बाबतीत, अर्जदार आपल्या शपथपत्रामध्ये त्या विषयीचे कारण नमूद करील आणि सक्षम प्राधिकारी त्यावर विचार करील व त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यावर, गुणवत्तेनुसार त्या दाव्यावर निर्णय देईल", अशी तरतूद आहे.

(३) अशा प्रकारची मागणी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अदा करण्यात येते. तसेच, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील गुणवंत ५०विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी परदेशी शिष्यवृत्ती अदा करण्यात येते. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मुलांसाठी १ व मुलीसाठी १ प्रमाणे शासकीय वसतिगृहे भाड्याच्या इमारती घेऊन सुरु करण्याचा निर्णय झाला आहे. विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या व्यक्तींना व्यवसाय व स्वयंरोजगारासाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत अर्थसहाय्य योजनेव्दारे कर्ज वितरीत करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाकडून सेंद्रिय कीटकनाशक खरेदीसाठी काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(३४) * २०२७८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना मोफत कीटकनाशक उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाकडून सेंद्रिय कीटकनाशक खरेदीसाठी काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये १५० कोटी रुपयांची अनियमितता झाली असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता नियुक्त करण्यात आलेल्या समितीसमोर उक्त निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक असताना त्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करण्यात आले असून निविदेतील अटी व शर्तीचा भंग देखील करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने निविदा प्रकियेमध्ये अनियमितता करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करुन सदरहू निविदा प्रक्रियेस स्थगिती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) निविदा प्रक्रियेमध्ये त्रुटी आढळून आल्यामुळे संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. तसेच, संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेकडून झालेल्या त्रुटीच्या अनुषंगाने त्यांना नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीमध्ये अनधिकृत धर्मस्थळ उभारण्यात आल्याबाबत

**(३५) * १९५६० ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :- (१) बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीतील मामा-भांजे डोंगरावर वन विभागाच्या मालकीच्या जागेवर अनधिकृत धर्मस्थळ उभारण्यात आल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात एअर फोर्सच्या तक्रारीनंतर, वन विभागाने पोलिसांना कारवाईचे पत्र दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनधिकृत धर्मस्थळ हटविण्याकरिता काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामधील येऊर वनपरिक्षेत्रातील मामा भांजे डोंगर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परिसरात सन १९८२ पासून धर्मस्थळाचे अतिक्रमण अस्तित्वात आहे.
(२) कान्हेरी हिल्स (येऊर) येथील एअर फोर्स स्टेशनच्या समन्वय समितीच्या बैठकीमध्ये उक्त अतिक्रमणाची बाब निदर्शनास आणून देण्यात अली आहे.
(३) सदर अतिक्रमणाबाबत चौकशी करण्यात आली असून त्यावर वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे. तद्‌नंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ५३ व ५४ अंतर्गत सदर अतिक्रमणाच्या अनषंगाने संबंधितास सुनावणीकरिता दिनांक १८/०६/२०२३ रोजी उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. उपरोक्त सुनावणीमध्ये धर्मस्थळाच्या मालकी हक्काबाबत कोणतेही वैध पुरावे उपलब्ध करुन देण्यात आले नाही. त्यामुळे प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (उत्तर), येऊर यांनी दिनांक ०७/०७/२०२३ रोजी सदर अतिक्रमण निष्कासीत करण्याचे आदेश पारीत केले आहेत. त्यानुसार अतिक्रमण निष्कासीत करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) योजनेच्या लाभापासून शेतकरी वंचित असलेबाबत

**(३६) * १९२७२ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) योजनेचा लाभ महाराष्ट्रातील अल्प व मध्यम शेतकऱ्यांना शासनाच्यावतीने देण्यात येत असून नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना राज्यातील पाण्याच्या उपलब्धतेनुसार पिकांच्या लागवडीवर लक्ष केंद्रित करून शेतकऱ्यांना हवामान बदलाचा सामना करण्यास मदत करते, तसेच महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यांतील ५१४२ गावांमध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना राबविण्यात आली असून मागील दोन महिन्यांपासून योजनेचे संकेतस्थळ बंद असल्यामुळे शेतकऱ्यांना सदर योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागत असल्याने त्याबाबत शेतकऱ्यांनी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेची व्याप्ती वाढवून उर्वरित गावे व लहान नगर पंचायत क्षेत्रांचा या योजनेमध्ये समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गावांची निवड करताना कोणते निकष लावण्यात येणार आहेत व शेतकऱ्यांना सदर योजनेचा लाभ मिळण्याकरिता शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) होय, निवेदन प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.

(२) व (३) शासन निर्णय दिनांक ३० जून, २०२३ अन्वये जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामध्ये सद्य:स्थितीत समाविष्ट असलेल्या १६ जिल्हयांसह विदर्भातील उर्वरित नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली अशा एकूण २१ जिल्हयांमध्ये अंदाजित रुपये ६००० कोटी किंमतीच्या जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा टप्पा-२ राबविण्यास शासनाची तत्वत: मान्यता देण्यात आली असून या प्रकल्पाचा टप्पा-२ च्या आखणीचे काम आणि गाव निवडीचे शास्त्रशुध्द पध्दतीने निकष ठरवून त्याआधारे गावांची निवड करण्यासाठी अपर मुख्य सचिव, कृषी यांच्या अध्यक्षतेखाली गाव निवड समिती स्थापना करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

(४) अशी बाब नाही.

-----------------

## गोळेगाव (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथील अवैध गौणखनिज उत्खनन प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(३७) * १९०४२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १७१९३ ला दिनांक २ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोळेगांव (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथील गट नं. ९० चे खाण मालक यांनी गट क्रमांक ९४ मधील जमिनीमध्ये अवैध गौण खनिज उत्खनन केल्याबाबत उप अधीक्षक, भूमी अभिलेख, तहसिलदार, औंढा नागनाथ व उपजिल्हाधिकारी, वसमत यांनी दोषींना आठ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदींप्रमाणे कोणतीही ठोस कार्यवाही न करता तसेच उक्त प्रकरणात गैरव्यवहार केलेल्या दोषींचा जिल्हा सत्र न्यायालयाने जामीन फेटाळण्यात आला असूनही संबंधित दोषींना अटक करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उप सचिव, मा.उप मुख्यमंत्री यांचे कार्यालय यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ च्या पत्रान्वये पोलीस अधीक्षक हिंगोली व तहसिलदार, औंढा यांना उक्त प्रकरणी सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त पत्रानुसार तसेच अवैधरित्या गौण खनिज उत्खननामुळे झालेले आर्थिक नुकसान वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली व दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे गोळेगांव, ता.औंढा ना., जि.हिंगोली येथील गट नं ९० चे संबंधित खाण मालक यांनी त्यांच्या जमिनी लगत असलेल्या गट नं.९४ मधून गौण खनिजाचे उत्खनन केल्याचे निदर्शनास आले असता, कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, औंढा ना. यांनी केलेल्या मोजणीनुसार गट नं. ९४ मधून १७३३९.३० ब्रास गौण खनिजाचे उत्खनन केल्याचे निर्दशनास आले. त्यानुषंगाने तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी औंढा (ना.) यांनी महसूल जमीन महसूल संहिता, १९६६ कलम ४८ (७) अन्वये दिनांक १४/१२/२०२१ च्या आदेशान्वये रुपये ०८,०६,२६,३५०/- इतक्या रकमेचे दंडात्मक आदेश पारित केले आहेत. तसेच सदर दंडात्मक रकमेचा भरणा न केल्याने संबंधित खाण मालक यांच्य गा.न.नं.७/१२ गट नं. ९० वर बोजा चढविण्यात आला आहे.

लोकप्रतिनिधी यांनी मा.उपमुख्यमंत्री यांना दिनांक ०६/०९/२०२२ रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने मा.उपमुख्यमंत्री यांचे कार्यालयाचे उप सचिव यांनी दिनांक १९/०९/२०२२ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी यांना पत्रात नमूद कलेल्या मुद्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या तद्नंतर जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी दिनांक २०/१०/२०२२ च्या पत्रान्वये लोकप्रतिनिधी यांच्या निवेदनातील मुद्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक, हिंगोली व तहसिलदार, औंढा ना. यांना दिलेल्या आहे.

गट नं. ९४ चे संबंधित मालक यांनी पोलीस स्टेशन, औढा ना. येथे दिलेल्या फिर्यादीवरून संबंधित खाणमालक यांच्याविरूध्द गु.र.क्र.००९५/२०२२ भा.द.वि.कलम ३७९,४४७,४२७,३४ व महारष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८ (७) व (८) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेवून त्यांना गुन्हयात दिनांक २४/०३/२०२३ रोजी अटक करून त्यांच्याकडून गुन्हयात वापरलेले वाहन टिपर व पोकलॅन्ड जप्त करण्यात आले. तसेच सदर गुन्हातील आरोपी विरूध्द मा.न्यायालयात दिनांक ०६/०४/२०२३ रोजी दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

-----------------

## वाघोलीबुटी (व्याहाळ खुर्द) (जि.चंद्रपुर) येथे वाघ हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या महिलांच्या वारसांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(३८) * २०१०५ श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघोलीबुटी (व्याहाळ खुर्द) (जि.चंद्रपूर) येथे प्रमिला रोहणकर व ममताबाई बोधलकर या दोन महिलांचा वाघाने केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाल्याचे दिनांक २० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाघोलीबुटी (व्याहाळ खुर्द) (जि.चंद्रपूर) परिसरात वाघ व अन्य हिंस्त्र प्राणी यांचा वावर वाढल्यामुळे, वाघांचा व अन्य हिंस्त्र प्राण्यांचा बंदोबस्त करण्याबाबत गावकऱ्यांनी स्थानिक प्रशासन व वन विभागाकडे वारंवार मागणी करुनही त्याबाबत वन विभागाने कोणती कार्यवाही केली नसल्यामुळे परिसरातील नागरिकांत भीतीचे व दहशतीचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाघोलीबुटी (व्याहाळ खुर्द) (जि.चंद्रपूर) परिसरात वाघांचा व अन्य हिंस्त्र प्राण्यांचा बंदोबस्त करण्याबाबत तसेच मृतांच्या वारसांना शासकीय धोरणानुसार आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) चंद्रपूर वनविभागातील सावली परिक्षेत्रांतर्गत वाघाच्या हल्ल्यात श्रीमती प्रेमिला रोहणकर व ममताबाई बोधलकर यांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार वाघाच्या हल्ल्यात मृत झालेल्या श्रीमती प्रेमिला रोहणकर व ममताबाई बोधलकर यांचे कायदेशीर वारसास प्रत्येकी रुपये २०.०० लक्ष अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे. तसेच विभागामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

- दिनांक २७/०५/२०२३ रोजी सदर परिसरात वावरत असलेल्या वाघाला जेरबंद करण्यात आले आहे.
- मनुष्य हानीची घटना होवू नये या करिता क्षेत्रिय कर्मचाऱ्यांमार्फत गस्त करण्यात आली.
- कॅमेरा ट्रॅप लावून वन्यप्राण्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्याची कार्यवाही करण्यात आली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोकणासह विदर्भ तसेच मराठवाड्यातील अहमदनगर व अन्य भागात वणवे लागण्याच्या घटना घडत असल्याबाबत

**(३९) * २०२०७ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुधाकर अडबाले : तारांकित प्रश्न क्रमांक १४१४६ ला दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोकणासह विदर्भ तसेच मराठवाड्यातील अहमदनगर सह अन्य भागात मोठ्या प्रमाणात दरवर्षी मार्च, एप्रिल व मे महिन्यादरम्यान सर्वाधिक ६ हजार ६७० वणवे लागल्याच्या घटना घडल्या असून वणव्यांमुळे हजारो हेक्टरवरील वनसंपदा, जंगली प्राणी, पक्ष्यांचा नैसर्गिक अधिवास, दुर्मिळ वनौषधी व नैसर्गिक पाणवठे इ. नष्ट झाले असून वन्य प्राण्यांचे जीवन धोक्यात आले असल्याचे नुकतेच माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वनांचे संरक्षण करण्याकरिता व नैसर्गिक साधनसंपत्तीचे होणारे नुकसान रोखण्यासाठी गावोगावी वणवे प्रतिबंधक पथके निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वणव्यांच्या घटना कमी करण्याबाबत, वणवे नियंत्रणासाठी जंगला जवळील गावातील नागरिकांमध्ये जनजागृती करुन तसेच वणवे विझविण्यासाठी वनविभागाला अत्याधुनिक साधने देण्याबाबत तसेच वणवा विरोधी मोहीम राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) राज्यात कोकणासह विदर्भ,मराठवाडा, अहमदनगर व अन्य भागात मार्च, २०२३ ते मे, २०२३ या कालावधीत घडलेल्या आगींच्या घटनांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | महिना/वर्ष | आगीच्या घटना | जळीत क्षेत्र (हे) |
|---|---|---|---|
| १ | मार्च, २०२३ | ११६६ | ३२२८.३७ |
| २ | एप्रिल, २०२३ | ९७० | २२९६.४३ |
| ३ | मे, २०२३ | ७४२ | १८४६.८४ |
| | एकूण | २८७८ | ७३७१.६४ |

वनवणव्यांमुळे जंगलातील पालापाचोळा (Ground Fire) जळला जातो. परंतु मोठी झाडे जळली जात नाहीत. वनवणव्यांमुळे वनसंपदा, जंगली प्राणी, पक्षांचा नैसर्गिक अधिवास, दुर्मीळ वन औषधी व नैसर्गिक पाणवठे नष्ट झाल्याचे व त्यांचे जीवन धोक्यात आल्याच्या घटना घडल्याचे निर्दशनास आलेले नाही.
(२) वनविभागामार्फत वनवणवासंवेदनशिल क्षेत्राचे सर्वेक्षण करुन क्षेत्रिय सतरावर वनवणवा व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात येतो. त्यानुसार वनवणवा प्रतिबंधात्मक पथके तयार केली जातात याबाबत या पथकातील क्षेत्रिय अधिकारी व कर्मचाऱ्यांना वनवणवा नियंत्रणाबाबत प्रशिक्षण देण्यात येते. तसेच आगींच्या घटनांची तातडीने माहिती मिळावी व तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करता याव्यात यासाठी राज्यस्तरावर, वनवृत्तस्तरावर तसेच विभागीय स्तरावर २४x७ वनवणवा नियंत्रण कक्ष कार्यान्वित असतो.
(३) वणव्यांच्या घटना कमी करण्याबाबत, वणवे नियंत्रणासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना/ कार्यवाही करण्यात येते:-

१) आधुनिक साधने म्हणून Fire Blower-७८, Fire Beaters, Fire Ranks, Safty Shoes, Fire

Extinguisher पुरवठा करण्यात येते.

२) वनवणवे नियंत्रणासाठी कक्षा सभोताल व कक्षातुन जाणाऱ्या दोन्ही बाजूला जाळ रेषा कापणे व जाळण्याची कामे करुन घेण्यात येतात.

३) Forest Survey of India च्या प्रणालीद्वारे Fire Alert System वर क्षेत्रिय अधिकारी कर्मचाऱ्यांच्या नोंदणी करण्यात आली असून ज्यायोगे संबंधितास आग लागल्या बाबत संदेश प्राप्त होऊन लागलीच आग विझवण्याची कार्यवाही करण्यात येते.

४) वन्यजीव प्रेमी यांचे व्हाट्सअप/SMS ग्रुप तयार करणे, अभयारण्यातील व अभयारण्याबाहेरील गावात वनवणवा बाबत कार्यशाळा आयोजित करणे, आगीवर नियंत्रण करण्याकरिता वनवणवा नियंत्रण कक्ष स्थापन करणे, गाव पातळीवरील संयुक्त वनव्यवस्थापन समितीचे अध्यक्ष/ सचिव तसेच स्थानिक लोकांची सभा आयोजीत करुन भिंती पत्रके, आठवडी बाजारात बॅनर लावून जनजागृती केली जाते.

५) "वन विभागाच्या हेल्प लाईन सेवा टोल फ्री क्रमांक १९२६" वर आलेल्या संदेशांवर तातडीने कार्यवाही केली जाते.

६) FSI व नासाच्या उपग्रह प्रणालीतुन प्राप्त फायर अलर्टस च्या माध्यमातुन वनवणवा विषयक घटनांची माहिती तात्काळ मिळविण्यासाठी वनकर्मचाऱ्यांची नोंदणी करण्यात आलेली आहे.

७) वनालगतच्या गावात ग्रामपंचायत, संयुक्त वन व्यवस्थापन समिती/ निसर्ग विकास समिती (EDC) तसेच शाळा व गावकऱ्यांमार्फत जनजागृती करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय व ठाणे महानगरपालिका अतिक्रमण विभागाच्या संयुक्त कारवाई दरम्यान नायब तहसिलदार व शीळ तलाठी यांना धक्काबुक्की केल्याबाबत

**(४०) * १९६७२ प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ठाणे येथील जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत तहसिलदार, नायब तहसिलदार व ठाणे महानगरपालिका अतिक्रमण विभाग यांच्या माध्यमातून दोन मजली इमारत पाडण्याची कारवाई करित असताना भूमाफियांनी घोळका करून नायब तहसिलदार व शीळ येथील तलाठी यांच्यावर हल्ला करीत अधिकाऱ्यांना धक्काबुक्की केली असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नायब तहसिलदार यांच्यासह तलाठ्यांवर हल्ला केल्याप्रकरणी शीळ डायघर पोलीस ठाण्यात भूमाफिया विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून, त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली तसेच भविष्यात अधिकाऱ्यांवर हल्ला होण्याच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.

मौजे डावले ता.जि.ठाणे येथील स.नं.१७९/१ व १७९/२ या शासकीय जमिनीवर अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आल्याने या ठिकाणी दिनांक १०/०५/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून अतिक्रमण निष्कासनाची कारवाई करीत असताना तेथे दुपारी १.०० वाजता लोक जमण्यास सुरुवात झाली व जमावातील दोन लोकांनी निवासी नायब तहसिलदार ठाणे व तलाठी साझा शिळ यांचेवर हल्ला केला व त्यांना धक्काबुक्की केली.

(२) हे खरे आहे.

सदर प्रकरणी शिळ डायघर पोलीस स्टेशन येथे भारतीय दंड संहिता अधिनियम १८६० चे कलम ३५३ व ३४ नुसार FIR No. ०१६९, दिनांक १०/०५/२०२३ रोजी १६-०८ वाजता गुन्हा दाखल केला आहे.

(३) सदर गुन्ह्याचे तपासात आरोपीत नामे (१) शेख अब्दुल कलाम हसन रजा उर्फ राजु, वय-३८ वर्षे, (२) मोहंमद उस्मान शब्बीर अहमद खान, वय-३५ वर्षे यांना दिनांक १०/०५/२०२३ रोजी २०-१६ वाजता अटक करण्यात आलेली असून अटक आरोपीतांचे विरोधात दिनांक ०५/०७/२०२३ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले आहे. तसेच अटक आरोपींविरूध्द सीआरपीसी, १९७३ कलम १०७ अन्वये प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली आहे.

तसेच भविष्यात शासकीय जागेवरील कोणतेही अतिक्रमण निष्कासनाची कार्यवाही करताना पोलीस विभागाकडून पुरेसा बंदोबस्त उपलब्ध करुन घेऊनच पुढील कार्यवाही करणेत यावी, असे जिल्हाधिकारी ठाणे यांनी सर्व तहसिलदार यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर येथील कृषी विभागातील मजगी कामाच्या निविदेत गैरव्यवहार केल्याबाबत

**(४१) * २०५६७ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघरच्या तत्कालीन उपविभागीय कृषी अधिकाऱ्याच्या कार्यकाळात वसई चिखलडोंगरी येथील सुमारे ८७ लाखांच्या मजगी कामाच्या निविदेत अपात्र ठेकेदाराला पात्र दर्शवून काम देण्यात आल्याचा दिनांक १ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मर्जीतल्या ठेकेदारांना कामे मिळण्यासाठी तत्कालीन उपविभागीय कृषी अधिकारी यांनी ७० लाखांची ऑफलाईन कामांचे वाटप केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि ठेकेदाराशी संगनमत करून निविदा अफरातफर करणाऱ्या संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २०/०२/२०२३ रोजी प्रसिध्द करुन ऑनलाईनव्दारे कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. तद्नंतर निविदा स्वीकृती व छाननी समिती समोर चित्रिकरणासह BOQ (तुलनात्मक तक्ता) ऑनलाईन पध्दतीने कामाच्या निविदा मंजूर करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तत्कालीन तहसिलदार, वसई यांचे कार्यकाळात शासकीय जमिनीवर अतिक्रमणे झाल्याबाबत

**(४२) * १९९८७ श्री.आमश्या पाडवी, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर येथील वसईच्या तहसिलदार उज्वला भगत बनसोडे यांच्या कार्यकाळात वसईतील खाजण, गुरचरण, पाणथळ, शासकीय, आकारी पड आदी शासकीय जमिनीवर अतिक्रमित होऊन त्यावर मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर बांधकामे झाली असतानाही, सदरहू अनधिकृत अतिक्रमणे व बांधकामांवर तहसिलदारांनी आर्थिक संगनमतानी कोणतीच कारवाई न करता बेकायदा संरक्षण दिल्याप्रकरणी वसई पर्यावरण बचाव समिती व वसई पश्चिम किनारपट्टीतील नागरिकांनी मार्च/एप्रिल, २०२३ मध्ये वसईतील प्रांत कार्यालयासमोर निषेध करुन सदर प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने समिती नेमून चौकशी केली आहे काय, सदर समितीने आपला अहवाल सादर केला आहे काय, त्या अनुषंगाने अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

वसई किनारपट्टी व पर्यावरण बचाव समिती यांनी दिनांक ०९/०१/२०२३ चे निवेदन मा.मुख्यमंत्री व मा.मंत्री (महसूल) यांना चिन्हांकित केलेले निवेदन उप विभागीय अधिकारी, वसई यांचेकडे सादर केलेले आहे. उक्त निवेदनावर जिल्हाधिकारी, कार्यालय यांचेस्तरावर छाननी सुरु आहे.

श्रीमती उज्वला भगत तत्कालीन तहसिलदार, वसई या दिनांक १२/०८/२०२० ते १३/०४/२०२३ या कालावधीत तहसिलदार वसई या पदावर कार्यरत होत्या सदर कालावधीत शासकीय जमिनीवरील एकूण ३११ अनधिकृत गाळे/झोपड्या/रहिवास व जोत्यांची बांधकामे निष्किासित करण्याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

-----------------

## आजरा व चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील मानवी वस्तींमध्ये हत्तींचा वावर वाढल्याबाबत

**(४३) * १९७४३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजरा व चंदगड (जि.कोल्हापूर) येथे मानवी वस्तीमध्ये हत्तींचा वावर वाढला असून हत्ती शेतातील पिकांचे व शेतीसाहित्यांचे नुकसान करीत आहे त्यामुळे तेथील रहिवाशांच्या जीवीतेस धोका निर्माण झाला असल्याने तेथील परिस्थिती चिंताजनक झाल्याची बाब माहे मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन येथील मानवी वस्तीतील हत्तींचा वावर रोखण्याबाबत व झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) आजरा व चंदगड क्षेत्रात सद्य:स्थितीत ७ हत्तींच्या कळपाचे अस्तित्व आहे. तथापि, मागील ५ वर्षात हत्तींमुळे कोणतीही जिवीत हानी झालेली नाही. हत्तीमुळे सन २०२०-२१ मध्ये १३८८, सन २०२१-२२ मध्ये ८८१ व सन २०२२-२३ मध्ये ४१५ शेतपीक व शेतीचे साहित्य नुकसानीची प्रकरणे निदर्शनास आली असून प्रस्तुत प्रकरणांमध्ये प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अनुक्रमे रुपये ७७.३४ लक्ष, रुपये ५२.४९ लक्ष व रुपये ६९.४३ लक्ष नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

मानवी वस्तीतील वन्यहत्तींचा वावर रोखण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वन्यहत्ती वनक्षेत्रातुन मालकी क्षेत्रात येऊ नयेत यासाठी वनहद्दीवर वन्यप्राणी प्रतिबंध चर खोदण्यात आले आहेत.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून वनतळी, माती बांधारे, सिमेंट बंधारे, गॅबीयन बंधारे बांधण्यात येतात. तसेच वनक्षेत्रात असलेले पाणवठे पुर्नजिवीत करण्यात येतात.
- वन्यप्राणी वावर असलेल्या क्षेत्रामध्ये वन कर्मचाऱ्यामार्फत गस्ती करण्यात येते. तसेच सदर क्षेत्रात ट्रॅप कॅमेऱ्याच्या सहाय्याने वन्यप्राण्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यात येते.
- वनक्षेत्रामध्ये गवती कुरणांचा विकास केलेला आहे.
- प्रायोगिक तत्त्वावर वन्यहत्ती हुसकाविण्यासाठी स्वयंचलीत आवाज करणारी यंत्रे वापरण्यात येत आहेत.
- वन्यहत्ती वनक्षेत्रातुन मानवी वस्तीत आल्यास त्यांना परत त्यांच्या नैसर्गिक अधिवासात पाठविण्याकरिता वन्यजीव बचाव दलाची (RRT) स्थापना करण्यात आली आहे.

- ८ ते १० क्षेत्रिय कर्मचाऱ्यांचा हाकारा गट तयार करुन हत्ती बाधित क्षेत्रातील गावांमध्ये जनजागृती करण्यात येते.
- हत्ती बाधित गावातील ग्रामस्थांसमवेत चर्चा करुन जनजागृती करण्याचे कार्य ट्रंक कॉल या अशासकीय संस्थेच्या मदतीने करण्यात येत असून त्यास उत्तम प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये मन परिवर्तन होत असून त्यांचा रोष कमी होत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आर्थिक स्थिती बिकट असलेल्या साखर कारखान्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(४४) * २०६७५ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक साखर कारखाने साखरेच्या दरातील चढउतार तसेच चुकीच्या व्यवस्थापनामुळे अडचणीत आले असल्यामुळे शेतकऱ्यांना ऊसाची रास्त आणि किफायशीर रक्कम देण्यासाठी काही कारखान्यांना निधीची चणचण भासत असून राज्य शासनाने या बिकट आर्थिकस्थिती असलेल्या साखर कारखान्यांना १,०८० कोटी रुपयांची मदत मंजूर केली असल्याचे तसेच मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यातील फक्त पाच साखर कारखान्यांना ५५० कोटी रुपये देण्याचा निर्णय घेवून उर्वरित कारखान्यांना अद्यापही मदत देण्यात आली नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून तद्नुषंगाने राज्यातील आर्थिक स्थिती बिकट असलेल्या इतर साखर कारखान्यांना मदत देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय सहकार विकास निगम यांच्यामार्फत वित्तीय संस्थांना थेट कर्ज पुरवठा करण्यासाठी पात्रता निकष ठरविण्यात आले आहेत. मात्र जे कारखाने या निकषात बसत नाहीत त्यांना NCDC थेट कर्ज पुरवठा न करता राज्य शासनामार्फत प्रस्ताव आल्यास कर्ज पूरवठा करण्यात येतो. त्यानुसार राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्याकडून राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना खेळत्या भागभांडवलासाठी देण्यात येणारे मार्जिन मनी कर्ज महाराष्ट्र शासनामार्फत (Routed through state government) उपलब्ध करुन देण्यात येते. त्यानुषंगाने राज्यातील ९ सहकारी साखर कारखान्यांचे रुपये १०२३.५७ कोटी एवढ्या रकमेचे व ५ सहकारी साखर कारखान्यांचे रुपये ८२५.०० कोटी असे एकूण रुपये १८४८.५७ कोटी इतक्या रकमेचे प्रस्ताव प्राप्त झाले होते.

विषयाधीन मार्जिन मनी लोन उपलब्ध करून देण्यासाठी शासन निर्णय दिनांक ४ मे, २०२३ अन्वये मा.मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयातील अटी व शर्तींनुसार ६ सहकारी साखर कारखान्यांचे फेरप्रस्ताव शासनास प्राप्त झाले आहेत. सदर ०६ पात्र सहकारी साखर कारखान्यांचे रुपये ५४९.५४ कोटी एवढया रकमेच्या प्रस्तावांस मंत्रिमंडळ उपसमितीची मान्यता झाली असून निधी उपलब्ध करण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव कार्यवाहीधीन आहे.

(२) व (३) शासन निर्णय ०४/०५/२०२३ मधील अटी व शर्तींनुसार राज्यातील पात्र सहकारी साखर कारखान्यांना राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांचेकडून महाराष्ट्र शासनामार्फत (Routed through state government) खेळत्या भागभांडवलासाठी मार्जिन मनी लोन उपलब्ध करुन देण्यासाठी साखर आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखालील गठित तांत्रिक छाननी समितीकडून छाननी करून पात्र सहकारी साखर कारखान्यांचे प्रस्ताव मंत्रिमंडळ उपसमिती समोर विचारार्थ ठेवण्यात येतात. त्यास मान्यता झाल्यानंतर निधी उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करण्यात येते.

-----------------

## चिखली (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील तत्कालीन सरपंच व इतरांनी बनावट कागद पत्राद्वारे गावठाण जमीन अकृषक दाखवून खरेदी केलेबाबत

**(४५) * २०११७ श्री.एकनाथराव खडसे : तारांकित प्रश्न क्रमांक १७६६६ ला दिनांक २ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील पूर्वीचा गट क्र.५०/१ब व सध्याचा गट क्र.६ ही गावठाण जमीन तत्कालीन सरपंच व इतरांनी बनावट कागदपत्राद्वारे अकृषक दाखवून खरेदी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त खरेदीबाबतची तक्रार श्री.विजय काकडे यांनी दिनांक २९ सप्टेंबर,२०२०, दिनांक १ डिसेंबर, २०२० व दिनांक २ डिसेंबर, २०२० रोजी जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

यांप्रकरणी अर्जदाराने दिनांक २९/११/२०२०. दिनांक ०१/१२/२०२० व दिनांक ०२/१२/२०२० रोजी जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या कार्यालयाकडे तक्रार अर्ज ई-मेलद्वारे तक्रार अर्ज केला होता.

(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, भुसावळ यांनी चौकशी करुन जिल्हाधिकारी, जळगाव यांना अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालानुसार तक्रारीमध्ये नमूद फेरफार नोंद क्र. ७०६ ज्या अभिलेखाच्या आधारे झाली त्या अभिलेखाची तपासणी करणे, प्रस्तुत जमिनीस अकृषिक परवानगी देताना सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर संबंधित भूधारकांना भूसंपादनाचा

मोबदला अदा करावा किंवा कसे याबाबत उचित निर्णय घेऊन अहवाल सादर करणेबाबत सक्षम प्राधिकारी (भूसंपादन) तथा उप विभागीय अधिकारी, भुसावळ यांना कळविले. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, भुसावळ यांनी सुनावणी घेऊन तक्रारदार व सामनेवाला यांना त्यांचे म्हणणे मांडणेकामी संधी दिली व युक्तीवाद व पुराव्याच्या आधारे सदर प्रकरणी दिनांक १८/०४/२०२३ रोजी तक्रार अर्ज निकाली काढला आहे.

(४) अशी बाब नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.